सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, २८ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३०३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## वक्फ बोर्ड विधेयकातील बदलांना 'जेपीसी'ची मंजुरी; १४ बदल करण्यात मान्यता




नवी दिल्ली : वक्फ बोर्ड विधेयकातील बदलांना संयुक्त संसदीय समितीने (जेपीसी) मान्यता दिली. समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी स्पष्ट केले की, अंतिम बैठकीत सर्व ४४ सुधारणांवर चर्चा करण्यात आली. यापैकी एनडीए खासदारांच्या १४ सूचनांना मान्यता देण्यात आली आहे. विरोधी सदस्यांनीही काही प्रस्ताव मांडले, परंतु मतदानादरम्यान ते फेटाळण्यात आले.

वक्फ (दुरुस्ती) विधेयकावरील संयुक्त संसदीय समिती अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान आपला अहवाल सादर करणार आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात समितीचा कार्यकाळ वाढविण्यात आला होता. वक्फ मालमत्ता नियमित करण्यासाठी बनवण्यात आलेल्या वक्फ कायदा, १९९५ वर गैरव्यवस्थापन, भ्रष्टाचार आणि अतिक्रमण यासारख्या मुद्द्यांवर टीका झाली आहे. जेपीसीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी बैठकीनंतर सांगितले की, समितीने स्वीकारलेल्या सुधारणांमुळे कायदा अधिक चांगला आणि प्रभावी होईल. यापूर्वी शुक्रवारी २४ जानेवारी रोजी दिल्लीत झालेल्या जेपीसी बैठकीत विरोधी सदस्यांनी गोंधळ घातला होता.

जेपीसीमध्ये गोंधळ झाल्यानंतर १० सदस्यांना निलंबित करण्यात आले होते. मसुद्यातील प्रस्तावित बदलांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ देण्यात आला नसल्याचा त्यांचा दावा होता. दरम्यान तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी आरोप केला होता की, बैठकांचा हा दौरा हास्यास्पद होता. आमचा आवाज ऐकू आला नाही. पाल यांनी हुकूमशाही पद्धतीने काम केल्याचे बॅनर्जी म्हणाले होते.

# उत्तराखंडमध्ये समान नागरी कायदा लागू!

डेहराडून : उत्तराखंडमध्ये आजपासून समान नागरी कायदा लागू झाला आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी 'यूसीसी'च्या पोर्टल आणि नियमांचे उद्घाटन केले. त्याचबरोबर त्याची अधिसूचना देखील जारी करण्यात आली आहे. उत्तराखंड हे समान नागरी संहिता लागू करणारे देशातील पहिले राज्य बनले आहे.

उत्तराखंडमध्ये २७ मे २०२२ रोजी समान नागरी संहितेसाठी तज्ञ समितीची स्थापना करण्यात आली होती. समितीने २ फेब्रुवारी २०२४ रोजी सरकारला आपला अहवाल सादर केला. यानंतर, ८ मार्च २०२४ रोजी विधानसभेत हे विधेयक मंजूर झाले. विधानसभेतून मंजूर झाल्यानंतर ते राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठवण्यात आले. येथून १२ मार्च २०२४ रोजी राष्ट्रपतींची मान्यता कायद्याला मिळाली. समान नागरी कायदा अंमलबजावणीसाठी तंत्रज्ञानावर आधारित प्रणाली लागू करण्यात आल्या. नागरिक आणि अधिकाऱ्यांसाठी ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यात आले. गेल्या २० जानेवारी रोजी, मंत्रिमंडळाने यूसीसी नियमांना अंतिम रूप दिले आणि ते मंजूर केले होते. शुक्रवारी झालेल्या मॉक ड्रिलमध्ये यापूर्वी येणाऱ्या समस्या सोडवण्यात आल्या. दुपारी १२.३० वाजता यूसीसी नियम आणि कायदे देखील लाँच करण्यात आले.

मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी यूसीसीच्या पोर्टल आणि नियमांचे उद्घाटन केले. यावेळी धामी म्हणाले की, हा केवळ आपल्या राज्यासाठीच नाही तर देशासाठीही ऐतिहासिक दिवस आहे. राज्यात क्षणापासून समान नागरी कायदा लागू होत आहे. सर्व नागरिकांना समान हक्क मिळत आहेत. सर्व धर्मातील महिलांचे हक्कही समान होत आहेत. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानतो, त्यांच्या पाठिंब्यामुळेच सर्व घडत आहे. मी न्यायमूर्ती प्रमोद कोहली आणि समितीचे आभार मानतो. सर्व विधानसभेच्या सदस्यांचे आभार. आयकर विभाग आणि पोलिस गृह विभागाचे आभार. आम्ही तेच करण्याचा संकल्प केला आहे. त्याने दिलेले वचन पूर्ण केले, असेही धामी यांनी यावेळी नमूद केले.

## वक्फ बोर्ड विधेयक प्रकरणी JPC ची २९ जानेवारीला महत्त्वाची बैठक

नवी दिल्ली : संसदेने वक्फ बोर्ड विधेयकाचा मसुदा संयुक्त संसदीय समितीकडे विचारासाठी पाठवला होता. या समितीपुढे आतापर्यंत अनेक सुधारणा प्रस्ताव म्हणून सादर झाल्या. यातील १४ सुधारणांवर विचार करण्याचा निर्णय संयुक्त संसदीय समितीने घेतला आणि इतर ४४ सूचना संयुक्त संसदीय समितीने बाद केल्या आहेत. आता बुधवार २९ जानेवारी रोजी संयुक्त संसदीय समितीची महत्त्वाची बैठक आहे. या बैठकीत १४ सुधारणांबाबत पुढे काय करायचे याचा अंतिम निर्णय होईल आणि समितीचा अहवाल संसदेकडे पुढील कारवाईसाठी जाईल. यामुळे वक्फ बोर्ड विधेयक प्रकरणी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सुधारित मसुदा सादर होण्याची शक्यता आहे.

भाजपा खासदार जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त संसदीय समितीची बैठक झाली. या बैठकीत मतदान झाले. मतदानाअंती बहुमताने फक्त १४ सुधारणांवर विचार करण्याचा आणि इतर ४४ सुधारणा बाद करण्याचा निर्णय झाला. यामुळे विरोधक नाराज झाले. पण हा मतदानाचा कौल असल्यामुळे संसदीय समितीला याआधारे पुढील कामकाज करावे लागेल, असे जगदंबिका पाल म्हणाले.

संसदेने वक्फ बोर्ड विधेयकाचा मसुदा नव्या स्वरुपात तयार करण्यासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना केली. माजी काँग्रेस नेते आणि सध्या भाजपाचे खासदार असलेले जगदंबिका पाल यांची संयुक्त संसदीय समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली.

## हिंडनबर्ग प्रकरणी सुनावणीस सर्वोच्च न्यायालयाचा नकार



नवी दिल्ली : अमेरिकेतील शॉर्ट सेलर कंपनी हिंडनबर्ग रिसर्च बंद करण्यात आली आहे. कंपनीचे संस्थापक नॅट अँडरसन यांनीच ही घोषणा केली आहे. ज्या हेतूने काम करत होतो ते पूर्ण झाले म्हणून कारभार बंद केल्याचे अँडरसन यांनी जाहीर केले आहे. यामुळे इथून पुढे हिंडनबर्ग रिसर्चच्या कोणत्याही अहवालावर सुनावणी करणार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. याआधी विशाली तिवारी नावाच्या व्यक्तीने ५ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाकडे अर्ज करुन हिंडनबर्ग रिसर्च प्रकरणी एका नव्या याचिकेची नोंदणी करण्याची मागणी केली होती. पण सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्टारने याचिका नोंदवण्यास नकार दिला होता. आता थेट सर्वोच्च न्यायालयानेच हिंडनबर्ग रिसर्चच्या कोणत्याही अहवालावर सुनावणी करणार नसल्याचे जाहीर केले आहे.

विशेष म्हणजे अमेरिकेतील हिंडनबर्ग रिसर्चच्या अहवालांचा आधार घेत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी केंद्र सरकारवर आरोप करत होते. पण हिंडनबर्ग रिसर्च बंद होताच या विषयावर बोलणे राहुल गांधींनी टाळले आहे. यामुळे भारताच्या राजकीय वर्तुळातून हिंडनबर्ग रिसर्च प्रकरण बाद होणार का यावरुन चर्चेला उधाण आले आहे.

मागील काही वर्षात हिंडनबर्ग रिसर्चने भारतातल्या ज्या कंपन्यांविरोधात उलटसुलट अहवाल सादर केले त्या कंपन्या सध्या आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत असल्याचे चित्र आहे. पण हिंडनबर्ग रिसर्च ही कंपनी बंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर इथून पुढे हिंडनबर्ग रिसर्चच्या कोणत्याही अहवालावर सुनावणी करणार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.

# ६३९७८ विद्यार्थी इ.१२ वी तर ६८२२३ देणार इ.१० वी ची परीक्षा

## परीक्षा कॉपीमुक्त व तणावमुक्त व्हाव्या-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२७(जिमाका)- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे येत्या फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात इयत्ता १० वी आणि १२ वी च्या परीक्षा होणार आहेत. जिल्ह्यात इयत्ता १२ वी ची परीक्षा ६३ हजार ९७८ विद्यार्थी तर इयत्ता १० वी ची परीक्षा ६८ हजार २२३ विद्यार्थी देत आहेत. त्यासाठी एकूण ३९९ परीक्षा केंद्रांवर व्यवस्था करण्यात आली आहे.

इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षा ह्या कॉपीमुक्त आणि तणावमुक्त व्हाव्यात. तसेच त्यासाठी शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि समाजातील सर्व घटकांचे सहकार्य आवश्यक आहे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी व मार्च महिन्यामध्ये इयत्ता १० वी आणि १२ वी च्या बोर्डाच्या परीक्षा होणार आहेत. इयत्ता १० वीची परीक्षा दि.२१ फेब्रुवारी ते १७ मार्च या दरम्यान असून इयत्ता १२ वी ची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या दरम्यान होणार आहेत. इयत्ता १२ वी साठी जिल्ह्यात १६१ केंद्र असून ६३ हजार ९७८ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. त्यासाठी २२ परीरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर इयत्ता १० वी ची परीक्ष २३८ केंद्रांवर होणार असून ६८ हजार २२३ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. या परीक्षेसाठीही २२ परीरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तालुकानिहाय परीक्षा केंद्र व विद्यार्थी संख्या या प्रमाणे-

इयत्ता १० वी- छत्रपती संभाजीनगर ग्रामिण- १७ केंद्र ५९२२ विद्यार्थी, छत्रपतीसंभाजीनगर शहर-७५ केंद्र २१ हजार ७५८ विद्यार्थी, गंगापूर ३१ केंद्र, ९८२० विद्यार्थी, कन्नड २२ केंद्र ५७१३ विद्यार्थी, खुलताबाद ११ केंद्र, २६३४ विद्यार्थी, पैठण-२१ केंद्र, ५९६० विद्यार्थी, सिल्लोड-२५ केंद्र ६६०७ विद्यार्थी, सोयगाव-६ केंद्र, १५०१ विद्यार्थी, वैजापूर १७ केंद्र, ४८१९ विद्यार्थी फुलंब्री १३ केंद्र ३४८९ विद्यार्थी.

इयत्ता १२ वी- छत्रपती संभाजीनगर ग्रामिण- २० केंद्र ८०८६ विद्यार्थी, छत्रपतीसंभाजीनगर शहर-३३ केंद्र १४ हजार २५५ विद्यार्थी, गंगापूर १४ केंद्र, ६४०० विद्यार्थी, कन्नड १९ केंद्र ६०१२ विद्यार्थी, खुलताबाद १२ केंद्र, ४६२५ विद्यार्थी, पैठण-१६ केंद्र, ५८०२ विद्यार्थी, सिल्लोड-१७ केंद्र ६०५३ विद्यार्थी, सोयगाव-८ केंद्र, ३११४ विद्यार्थी, वैजापूर ११ केंद्र, ५३०१ विद्यार्थी फुलंब्री ११ केंद्र ४३३० विद्यार्थी.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यामध्ये कॉपीमुक्त अभियान राबवून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी, शिक्षण विभागासह सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवून काम करावे. कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे काम करणाऱ्या शिक्षक, शिक्षण संस्था व केंद्र यांचा सन्मान केला जाणार असून कॉपी करण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आज परीक्षेतील गैर प्रकार टाळण्यासाठी दक्षता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) अश्विनी लाटकर, शिक्षण मंडळ सहसचिव सचिव प्रियाराणी पाटील, शिक्षणाधिकारी(प्राथमिक) जयश्री चव्हाण, शिक्षण अधिकारी(योजना) अरुणा भूमकर यांच्यासह सर्व गटशिक्षण अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात १० वी आणि १२ वीच्या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर परीक्षेतील गैर प्रकार टाळण्यासाठी नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. संवेदनशील परीक्षा केंद्रावर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त वाढवण्याचे नियोजन करण्यात आले आहे,अशी माहिती श्रीमती लाटकर यांनी दिली. शहरांमध्ये आणि ग्रामीण भागातील कोणत्याही परीक्षा केंद्रावर कॉपी होणार नाही याची खबरदारी परीक्षा केंद्र, संस्था चालक, नियुक्त कर्मचारी,अधिकारी, पोलीस यंत्रणा यांनी घ्यावी, असे लेखी आदेश देण्यात येतील. कॉपी होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून केंद्राच्या जवळ असणाऱ्या झेरॉक्स मशीन बंद करण्यात येतील. परीक्षाकेंद्राबाहेर पालकांची होणारी विनाकारण गर्दी, विविध पुस्तकांची विक्री थांबवण्यात यावी, याबाबतचे सर्वेक्षण संबंधित तालुकास्तरावर शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी करावे. परीक्षा केंद्राबाहेर प्रतिबंधात्मक लागू करण्याविषयीचे आदेश निर्गमित करण्यात यावे. परीक्षा केंद्रावर भरारी पथक, बैठे पथक, केंद्रामधील बदल व स्थानिक वातावरण यानुसार नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी स्वामी यांनी शिक्षण विभागांना दिल्या. कॉपीमुक्त अभियान राबवण्यासाठी लोकांमध्ये जाणीव जागृतीसाठी समुपदेशन, कार्यशाळा,विविध कार्यक्रम, प्रसारमाध्यमातून आवाहन करावे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कॉपीमुक्त आणि तणावरहीत परीक्षा पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले.

## सोमवारी (दि.३ फेब्रुवारी रोजी) लोकशाही दिन

छत्रपती संभाजीनगर, दि.२७(जिमाका)- दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जातो. फेब्रुवारी महिन्यासाठी सोमवार दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि. ३ रोजी दुपारी १२ वाजता हा लोकशाही दिन होईल, असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती संगीता राठोड यांनी कळविले आहे. नागरिकांनी आपल्या तक्रारी अर्जांचे निवेदने, अर्ज सकाळी ११ते १२ या वेळात दाखल करावे. अर्ज विहित नमुन्यात असावा. वैयक्तिक तक्रार असावी. तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दाखल केला असल्यास त्याची पोहोच सोबत आणावी,अशी सुचना देण्यात आली आहे. तसेच न्याय प्रविष्ठ प्रकरण, राजस्व अपिल, सेवाविषयक व आस्थापनाविषयक व लोकशाही दिनात यापूर्वी दाखल केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## निवडणूक प्रक्रियेतील यश सामुहिक प्रयत्नांमुळेच- विभागीय आयुक्त दिलीप गावडे

छत्रपती संभाजीनगर, दि.२७(जिमाका) - सन २०२४ चे निवडणुकांचे वर्ष होते. या एकाच वर्षात लोकसभा आणि विधानसभा या दोन महत्त्वाच्या निवडणुका पार पडल्या. निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी सर्व विभागांचा समन्वय सहकार्य आवश्यक असते, ते एक सामुहिक कार्य असून त्यातील प्रत्येकाचे योगदान हे सारखेच मोलाचे आहे,असे प्रतिपादन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज येथे केले

राष्ट्रीय मतदार दिन (दि.२५ जानेवारी) कार्यक्रमाचे आयोजन आज जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनीयार, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, पोलीस उपायुक्त नितीन बगाटे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहा, निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सगळ्यांना मान्यवरांच्या हस्ते १४५ जणांना सन्मानपूर्वक प्रशस्तीपत्र वितरण करण्यात आले. त्यानंतर हर्सूल गाव येथील मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. तसेच निवडणूक कालावधीत मतदार जनजागृतीचा भाग म्हणून घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, नाटक स्पर्धा विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच नव्याने मतदार नोंदणी केलेल्या युवा मतदारांना मतदार ओळखपत्रही वाटप करण्यात आले.

मनपा आयुक्त जी.श्रीकांत यांनी निवडणूक प्रक्रियेत सगळ्या विभागांनी केलेल्या कामगिरीचा उल्लेख करुन सांगितले की, निवडणूक प्रक्रिया राबविणे हे प्रशासकीय कौशल्याचे काम आहे. सर्व नियम व कायद्यांचा अभ्यास करुन त्याची योग्य अंमलबजावणी करणे महत्त्वाचे असते. त्यासाठी सर्व विभागांचा एकमेकांशी संवाद व समन्वय आवश्यक असतो. प्रास्ताविक देवेंद्र कटके यांनी तर सुत्रसंचालन डॉ. मीरा ढास यांनी केले.

## शेतकरी, संस्थेच्या हितासाठी काम करतोय : डॉ. मनोज राठोड

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.२७ जानेवारी - तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी,संस्थेच्या हिताचे काम करत असताना चांगल्या कामांना नेहमी विरोध होत असतो असे डॉ.मनोज राठोड यांनी पत्रकार परिषदेत आपले मत व्यक्त केले



गेल्या काही दिवसांपासून संचालक आणि सभापती यांच्यात ४ एकर १६ गुंठे जमिनच्या भाडे पट्टा करार संदर्भात मतभेद सुरू आहेत कृउबाचे सभापती डॉ. मनोज राठोड यांनी दि. २० जानेवारी दुपारी १२ वा.पत्रकार परिषद घेऊन, कृषी उत्पन्न बाजार समितीचे न्यायालयीन कागदपत्रे दाखवत या विषयी खुलासा केला. सभापती राठोड यांनी सांगितले की सदरील कापूस प्रक्रिया संस्थेला १९७२ साली ९९ वर्षाचा भाडेतत्त्व करार करून दिला आहे तो संपण्यासाठी २०७२ पर्यंत वाट पाहावी लागेल मात्र तत्पूर्वी या संस्थेची मान्यता रद्द झाल्याने या संस्थेच्या ताब्यात असलेली जमीन दुसऱ्या संस्थेला किंवा खाजगी भाडेतत्त्वावर देता येईल का अशी विचारपूस करण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयत ( रजिस्ट्री ऑफिस ) गेलो होतो.

मात्र काही संचालकांनी याबाबत गैरसमज निर्माण करून या महीन्याचा बैठकीत गोंधळ घालत विषय पत्रिकेतील संस्थेच्या हिता संदर्भात निर्णय घेऊ दिले नाही.मात्र पुढील बैठकीत त्यांचा गैरसमज दूर करण्यात येऊन शासन निर्णय व संचालकाच्या निर्णया शिवाय कृषी उत्पन्न बाजार समितीची कुठलीही मिळकत भाडेतत्त्वावर देण्यात येणार नाही तसेच पुढे बोलताना ते म्हणाले की सभापतीचा पदभार स्वीकारल्या पासून संस्था नफ्यात आणली असून संस्थेच्या हितासाठी कायम कटिबद्ध राहणार आहे.असे मत त्यांनी व्यक्त केले.

## गांधेली दुग्धशाळा येथे ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण

छत्रपती संभाजीनगर : आज दिनांक २६/०१/२०२५ रोजी गांधेली दुग्धशाळा येथे ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त संघाचे अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आणि संघात उत्कृष्ट काम करणारे गुणवंत कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रोत्साहनपर सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले, यामध्ये दत्ता वाघ, कु.अश्विनी फुलमाळकर, विजय वर्मा मदन फटांगडे, रविंद्र बांगर, दिलीप दहातोंडे, अक्षय कुमार जाधव, भिवसन काकडे व कु. कल्पना पंडीत यांचा समावेश होता. यांनंतर संघाचे अधिकारी व कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त संघाच्या पुढील कामकाज आणखी चांगले करून कौतुकाचे मानकरी व्हा असे आवाहन अध्यक्ष



गोकुळसिंग राजपूत यांनी केले तसेच संचालक रमेश पाटील डोणगावकर यांनी संघाच्या आर्थिक उन्नती कशी होईल यावर लक्ष वेधून सूचना केल्या आणि मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी संघाच्या सध्याच्या दूध व दुग्धजण्य पदार्थांची विक्रीत जास्तीत जास्त वाढवावी असे सूचित केले. यावेळी संघाचे संचालक राजेंद्र जैस्वाल, रमेश पाटील डोणगावकर, श्री व सौ. सुरडकर ताई, व्यवस्थापकीय संचालक सुरेश पहाडीया आणि प्रशासकीयअधिकारी कैलास देशमुख, प्रकल्प व्यवस्थापक गणेश सिंग, गणेश धोत्रे, मार्केटींग इंचार्ज पवन कुमार डांगी, संकलन अधिकारी कुणाल राठोड व सर्व विभागप्रमुख कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून राष्ट्रध्वजवंदन

अहिल्यानगर दि. २६: भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पोलीस कवायत मैदान येथे झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रध्वज फडकावून राष्ट्रध्वजवंदन केले.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल आदी उपस्थित होते.

यावेळी शानदार संचलनाद्वारे राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. संचलनात पोलीस दलाचे पुरुष आणि महिला पोलीस, गृहरक्षक दल, वाहतूक पोलीस, बँड पथक, श्वान पथक, वज्रवाहन, सायबर सेल जनजागृती वाहन, क्षयरोग दुरीकरण वाहन, बालविवाहास प्रतिबंध जनजागृती वाहन तसेच न्यू आर्टस अँड कॉमर्स, सायन्य महाविद्यालय, त्रिमुर्ती पब्लीक स्कूल, नेवासा, आठरे पब्लिक स्कूल, वर्का हायस्कुल, कारमेल कॉन्व्हेंट स्कूल, दिवटेपाटील पब्लिक स्कूल, स्नेहालय स्कूल, मेहेर इंग्लिश स्कूल या शाळांच्या मुले व मुलींच्या पथकांनी सहभाग घेतला.

यावेळी शहीद नायक एकनाथ कर्डिले यांना पंतप्रधान श्रीमती शेख हसिना गण प्रजातंत्रात्मक बांग्लादेश सरकारद्वारे मिळालेले सन्मानपत्र वीरपत्नी कौशल्याबाई कर्डिले यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.



राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झालेले स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र देवमन यांचा तसेच पोलीस दलामध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, सहायक फौजदार रवींद्र पांडे, पोलीस हवालदार सुरेश माळी, विश्वास बेरड, पोलीस कॉन्स्टेबल फुरकान अब्दुल मुजीब शेख, प्रशांत राठोड यांचाही पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमानंतर पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, निमंत्रितांची भेट घेऊन प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांचे कुटुंबीय विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

सर्वांगीण विकासातून राज्यातील अग्रगण्य जिल्हा म्हणून अहिल्यानगरची ओळख निर्माण करु- पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त केलेल्या भाषणात जिल्ह्यातील नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासातून राज्यातील अग्रगण्य जिल्हा म्हणून अहिल्यानगरची ओळख निर्माण करु, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

पालकमंत्री म्हणाले, भारतीय राज्यघटनेचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणे ही सर्वांच्यादृष्टीने अत्यंत अभिमानाची व प्रेरणादायी बाब आहे. 'लोकांनी, लोकांसाठी चालवलेले लोकांचे राज्य' हा लोकशाहीचा आत्मा जपतांना, आपल्या देशाची ७५ वर्षांची यशस्वी वाटचाल ही जगासमोर आदर्श लोकशाही व्यवस्थेचे उदाहरण ठरले आहे.

स्वातंत्र्यानंतर देशाने शेती, उद्योग, व्यापार, सहकार, शिक्षण, तंत्रज्ञान आणि सामाजिक सुधारणांमध्ये केलेली प्रगती सर्वांना अभिमान वाटावा अशीच आहे. राज्य घटनेतील समानता, आणि बंधूत्वाचे तत्व स्विकारतांना राज्याच्या विकासात समाजातील सर्व घटकांना सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न राज्य शासनामार्फत करण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.

'समृद्ध शेती आणि संपन्न शेतकरी' हे उद्दिष्ट समोर ठेऊन शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांमधून शेतकऱ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन प्रयत्नशिल आहे.

अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने स्मारक, नेवासा येथे संत ज्ञानेश्वर महाराज सृष्टी प्रकल्प, पर्यटन विकास, शैक्षणिक संस्थांना एकत्रित करत रोजगार निर्मिती यासह विकास आराखड्याच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाचे प्रयत्न करण्यात येत आहेत. या विकासकामामध्ये सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहनही पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी यावेळी केले.

पालकमंत्री विखे पाटील यांना विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठामार्फत राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही मानद पदवी देऊन सन्मानित केले. त्याबद्दल जिल्ह्यातील नागरिकांच्यावतीने जिल्हाधिकारी श्री.सालीमठ यांनी त्यांचा सन्मान केला.

### जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रध्वजास मानवंदना

अहिल्यानगर दि.२६-भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी राष्ट्रध्वज फडकावून राष्ट्रध्वजवंदन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, उपजिल्हाधिकारी अरुण उंडे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी गजानन नकासकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आयडीएफसी फर्स्ट बँकेचा नफा १५टक्के वाढला

मुंबई : आयडीएफसी फर्स्ट बँकेने आज ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांचे अलेखापरिक्षित आर्थिक निकाल जाहीर केले. आयडीएफसी फर्स्ट बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले, आमची बँक कर्ज आणि ठेवींमध्ये चांगली वाढ करत आहे. आमच्या ग्राहकांच्या ठेवी २९टक्के वार्षिक दराने वाढून २,२७,३१६ कोटी रुपयांवर पोहोचत आहेत, तर सीएएसए गुणोत्तर ४८टक्के वर टिकून आहे. कर्जे आणि अ‍ॅडव्हान्स २२टक्के वार्षिक दराने वाढून २,३१,०७४ कोटी रुपयांवर पोहोचले आहेत. उद्योग परिस्थितीचा विचार करून आम्ही विशेषतः मायक्रो-फायनान्स कर्ज बुकचे बारकाईने निरीक्षण करत आहोत. बँकेच्या एकूण कर्ज बुकची मालमत्ता गुणवत्ता स्थिर आहे, एकूण एनपीए १.९४टक्के आणि निव्वळ एनपीए ०.५२% आहे. मायक्रो-फायनान्स कर्ज बुक वगळता, बँकेच्या बुकचा जीएनपीए आणि एनएनपीए १.८१टक्के आणि ०.४९टक्के पेक्षा कमी आहे.

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २७ जानेवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल सेठ मोतिलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्सहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन बाळु स्वामी सर, व शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला सर हे होते. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करुन सरस्वती मातेचे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला सर यांनी आपल्या भाषणाद्वारे आजच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व विद्यार्थांना समजावुन सांगितले. या विशेष दिवशी पालकांनीही हजेरी लावली होती. शाळेतिल सर्व विद्यार्थांनी पिटी हॅन्ड करुन , देशभक्ती वर गिते गायली. शाळेतील विद्यार्थांनी नृत्य, भाषणे, नाटक सादर करत उपस्थितांची मने जिंकली. सॅक रेस, रनिंग रेस, लिंबु चमचा, कबड्डी, खो- खो अशा खेळांमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे वाटप करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेतील इयत्ता सहावी, सातवी, आठवी च्या विद्यार्थांनी केले, व आभार प्रदर्शन शाळेतील शिक्षिका अनिता धर्मे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडण्यासाठी शाळेतील शिक्षक वर्षा चव्हाण, काजल देशमुख, सोनाली खोंड, अनिता धर्मे, भारती जाधव, प्रकाश करोडीवल, कृष्णा भालेराव व शाळेतील क्रिडा शिक्षक पवन घुगे शाळेतील सर्व विद्यार्थी , शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

## ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल मध्ये ७६वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २७ जानेवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतिलाल तोतला शैक्षणीक संस्था संचलीत ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल मध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारत माता की जय, वंदे मातरम च्या जय घोषात विद्यार्थ्यांची सकाळी रॅली काढण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला सर होते.

मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला सर यांनी आपल्या भाषणाद्वारे आजच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व विद्यार्थांना समजावुन सांगितले. या विशेष दिवशी पालकांनीही हजेरी लावली होती. नर्सरी, जुनियर केजी, सीनियर केजी च्या विद्यार्थींनी देशभक्तीवर गिते, नृत्य, भाषणे सादर करत उपस्थितांची मने जिंकली. तर काही विद्यार्थी सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्य सैनिकांच्या वेशभुशेत आले होते.

फ्रॉंग जंप, रनिंग, बॉल कलेक्टींग, बुक कलेक्टींग, बॅक रेस, संगित खुर्ची अशा खेळांमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे वाटप करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेतील शिक्षिका मनिषा जाधव यांनी केले, कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीतेने करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडण्यासाठी शाळेतील शिक्षिका मनिषा जाधव, अवनी चव्हाण, प्रतिक्षा पोटे, रेखा चव्हाण, नंदीनी चव्हाण, यांनी परिश्रम घेतले.

## शहरात प्रजासत्ताक दिन उत्साहात; तालुका क्रिडा संकुलावर शासकीय मुख्य समारोह

तभा वृत्तसेवा



कन्नड : दि.२७ जानेवारी - शहरात ७६ वा प्रजासत्ताक दिन राविरी उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य समारोह तालुका क्रिडा संकुलावर आयोजित करण्यात आला होता, क्रीडासंकुलनावर उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. याठिकाणी आमदार संजना जाधव , उपविभागिय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड, तहसिलदार विद्याचरण कडवकर, गट विकास अधिकारी चंद्रहार ढोकणे यांची प्रमुख उपस्थिती होती. तहसील कार्यालयाच्या प्रांगणात तहसीलदार विद्याचारण कडवकर यांच्या हस्ते ध्वज फडकवण्यात आला.

नगर परिषदेच्या प्रांगणात प्रशासक तथा उपविभागिय अधिकारी संतोष गोरड यांच्या हस्ते तर पंचायत समिती मध्ये प्रशासक तथा गट विकास अधिकरी चंद्रहार ढोकणे यांच्या हस्ते ध्वज फडकवण्यात आला, शहर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक आर.बी. सानप यांच्या हस्ते तर ग्रामीण पोलिस ठाण्यात प्रजासत्ताक दिनी सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार यांच्या हस्ते ध्वज फडकवण्यात आला.

# सोयगाव येथे एसटी दरवाढ बाबत रस्ता रोको; तहसीलदार यांना निवेदन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२७ जानेवारी : महाराष्ट्र राज्यात सध्या महागाई ने डोळे वर काढले असुन त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे त्यामध्ये राज्य सरकार कडून राज्यभर एसटीचा प्रवास महाग होत असल्याने नागरिकांना आर्थिक भुदंड सोचावा लागणार असल्याचे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)पक्षाचे पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रात सोमवारी दि.२७ सोमवार रोजी सोयगाव शहरातील बसस्थानक वर शिवसेना तालुका प्रमुख दिलीप मचे,रवींद्र काळे,राजेंद्र काळे,दिनेश हजारी, रवींद्र काटोले यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी आकरा वाजता महीला व पुरुष यांच्या सह दोन तास रस्ता रोको करण्यात आला.

दोन दिवसापूर्वी राज्य सरकारने एसटी भाडेवाढ होत असल्याचे जाहीर करण्यात आले असुन राज्यातील शेतकऱ्यांना शेत मालाला भाव नाही कापुस हमी भावापेक्षा ही कमी किमतीत व्यापारी खरेदी करीत आहे तर दैनंदिन जीवनात लागणारे साहित्य तेल, साखर,शेगदांने,गुळ,साबणसह अनेक दैनंदिन जीवनातील वस्तू दिवसांदिवस महाग होत आहे त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांनचे जगणे आवघड होताना दिसून येत आहे तसेच राज्य सरकारने शेतकऱ्यांना कर्ज माफी देऊ हे आश्वासन धुळ खात पडुन आहे यासह अनेक मागण्यांसाठी महाविकास आघाडी च्या वतीने शहरातील सोयगाव बसस्थानक वर स्ता रोको केला होता.रस्ता रोको होत असताना रस्ता रोकोचे रुपांतर भाषणात झाले त्यामुळे काही काळ रस्तावर वाहनाची रांग लागली होती.

यावेळी तालुकाप्रमुख दिलीप मचे,कॉंग्रेस तालुकाध्यक्ष राजेंद्र काळे,शहरप्रमुख रविंद्र काटोले,शहरध्यक्ष रवींद्र काळे,दिनेश हजारी,तालुका संघटक गुलाबराव कोलते, अजय नेरपगारे,गणेश कापरे,सुरेश फुसे,इंद्रजित साळुंखे, विजय कदम,सुरेश फुसे,कलीम पठाण,मुरलीधर चव्हाण, कडुबा मिसाळ,धोंडू पाटील,अक्षय औंरगे,माजी नगरसेविका छायाबाई काटोले,सुनिताबाई चव्हाण,मिरा बारी,रुखमनबाई कोळी,सारदाबाई तेली यांच्या सह महिला,पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तर यावेळी सोयगाव तहसील कार्यालयाचे नायब तहसिलदार यांनी मागणीचे निवेदन देण्यात आले.या रस्ता रोको साठी काही अनुचित प्रकार घडू नाही म्हणून सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली दिलीप पवार,रवींद्र तायडे,पवन तायडे,प्रवीण देवरे यांनी बंदोबस्त ठेवण्यात होता.

## हिंगोली जिल्ह्याला गरीब म्हटल्याने पालकमंत्री यांच्याबद्दल चर्चांना उधाण

तभा वृत्तसेवा



हिंगोली, दि २७ जानेवारी : मी पहिल्यांदा मंत्री झालो. पालकमंत्री पदही मिळाले. पण मी गरीब असल्यामुळे मला गरीब जिल्ह्याचे पालकमंत्री केले. याबाबत मी पक्षाला विचारणार आहे. या विधानामुळे आता चर्चांना उधान आले आहे.

पालकमंत्री झिरवाळ यांनी हिंगोली जिल्हा गरीब असल्याचे नेमके कोणते निकष लावले? हिंगोली जिल्हा मागास असल्याने असे ते म्हणाले का? आदिवासी बहुल जिल्हा असताना असे बोलणे योग्य आहे का? मागास जिल्ह्याचा विकास करणे खरे तर आव्हानात्मक आहे. या आव्हानाला स्वीकार करणे अपेक्षित असताना जिल्हा गरीब आणि स्वतः गरीब म्हणण्याची वेळ त्यांच्यावर आली. याबद्दल आता चर्चा झडू लागल्या आहेत.

हिंगोली जिल्हा सुरुवातीपासूनच मागास राहिला. या जिल्ह्याला राजकीय दृढ इच्छाशक्ती असलेलं नेतृत्व मिळाले नाही. त्यामुळे जिल्ह्याचा विकास पाहिजे तसा झाला नाही. लहान जिल्हा, मागास जिल्हा असेच नेहमी म्हटल्या जाते. आदिवासी, बंजारा, ओबीसी बहुल जिल्हा आहे. त्यांना विकासाच्या मुख्य धारेत आणण्यासाठी इच्छाशक्ती पाहिजे. परंतु ती अद्याप लाभली नाही. त्यात मागील काळात भाजपचे पालकमंत्री दिलीप कांबळे, कॉंग्रेस वर्षा गायकवाड, शिवसेनेचे अब्दुल सत्तार जिल्ह्याचे पालकमंत्री होते. बाहेर जिल्ह्याचे पालकमंत्री दिल्यामुळे त्यांना हिंगोली जिल्ह्याचे प्रश्न, समस्या याबद्दल काय आपुलकी असणार?

आताही महायुती सरकारने जिल्ह्याचे पालकमंत्री पद नरहरी झिरवाळ यांना दिले. परंतु पहिल्याच भेटीत त्यांनी गरिबाला गरीब जिल्हा दिला की काय असे वक्तव्य केले.

एका सत्कार कार्यक्रमात त्यांनी बोलताना जिल्ह्यातील तरुण, शेतकरी यांच्यासह अन्य प्रश्न सोडविणार असे ही म्हटले परंतु हिंगोली जिल्हा गरीब असल्याचे कोणते निकष लावले?

वास्तविक झिरवाळ यांना आदिवासी बहुल जिल्ह्याची सेवा करण्याची आणि मागास जिल्हा असल्यामुळे विकास कामे करण्याची उत्तम संधी आहे. त्यांनी हे आव्हान स्वीकारून जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी अवैध धंदे बंद करुन तरुणांना दिशा देण्याची गरज आहे.

## टीजेएसबी सहकारी बँकेच्या शिरपेचात पुन्हा मानाचा तुरा

### इंडियन बँक्स असोसिएशन ने तंत्रज्ञान आधारित ग्राहक सेवेसाठी चार पुरस्कारांनी सन्मानित केले



ठाणे, दि. २७ जानेवारी : देशातील नागरी सहकारी बँकात आघाडीवर असणाऱ्या टीजेएसबी सहकारी बँकेला नुकत्याच झालेल्या विसाव्या वार्षिक बँकिंग तंत्रज्ञान परिषद आणि पुरस्कार सोहळ्यात चार प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहेत. इंडियन बँक्स असोसिएशन (आयबीए) या संस्थेने टीजेएसबी सहकारी बँकेच्या तंत्रज्ञानाधारित ग्राहक सेवेची नोंद घेऊन सन्मानित केले आहे.

आयबीए ने टीजेएसबी सहकारी बँकेला सर्वोत्कृष्ट डिजिटल सेल्स, पेमेंट्स व एंगेजमेंट (विजेते), सर्वोत्कृष्ट टेक टॅलेंट व ऑर्गनायझेशन (विजेते),सर्वोत्कृष्ट आयटी रिस्क मॅनेजमेंट (विशेष उल्लेख), सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञान बँक (विशेष उल्लेख) हे चार पुरस्कार दिले आहेत. टीजेएसबी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष वैभव सिंघवी यांनी हे पुरस्कार आरबीआयचे डेप्युटी गव्हर्नर टी. रबी संकर, आयबीएचे चेअरमन एम. व्ही. राव, आयआयटी मुंबई येथील प्राध्यापक दिपक पाठक यांच्या हस्ते स्विकारला. यावेळी बँकेचे अधिकारी उपस्थित होते.

टीजेएसबी सहकारी बँकेने आपल्या कार्यपद्धतीतून आधुनिक तंत्रज्ञानाच्याद्वारे ग्राहक सेवा आणि डिजिटल बँकिंगच्या क्षेत्रात नवे मापदंड स्थापित केले आहेत. या पुरस्कारांनी बँकेची विश्वासार्हता अधोरेखित झाली आहे. नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्यासाठी बँक कटिबद्ध आहे.

## जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे विद्यार्थी याच्या कलागुणाचा कलाविष्कार कार्यक्रम उत्साहात



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२७ जानेवारी

उपक्रमशिल शाळा रामजीनगर येथे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्याच्या कलागुणाना वाव मिळावा यासाठी कलाविष्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमा मध्ये विद्यार्थ्यानी आपल्या कलागुणाचे देशभक्तीपर गीतावर नृत्य सादरीकरण करुन प्रेक्षकाची वाहवा मिळवली.

विद्यार्थ्याचा उत्साह वाढविण्यासाठी नगरपंचायत सोयगावच्या नगराध्यक्षा आशाबाई तडवी,सोयगाव गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव, सोयगाव केंद्र प्रमुख फिरोज तडवी,उपस्थित होते. कलाविष्कार कार्यक्रमा अगोदर शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोज आगे याच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कलाविष्कार कार्यक्रमास अध्यक्ष मनोज आगे,समाजसेवक राजेंद्र कुडके,शंकर जेठे,विठ्ठल इगळेआदीत्य श्रीखंडे,सागर इंगळे,शिवा राऊत,ज्ञानेश्वर जाधव,ज्ञानेश्वर सोनवणे,रघु इंगळे,प्रकाश सोनवणे,शालेय समिती सदस्य योगेश बोखारे,एकनाथ इगळे,संतोष इगळे यानी सहकार्य केले.कलाविष्कार कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सहशिक्षक गोपाल चौधरी,प्रशिक्षक शिक्षक शुभम देसले यांनी अथक परिश्रम घेतले.यावेळी पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

## पालक दिनानिमित्त विभागीय नियंत्रक सचिन क्षीरसागर यांची भेट



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२७: छत्रपती संभाजीनगर विभागीय नियंत्रक सचिन क्षीरसागर यांनी पालकदिना निमित्त गंगापूर आगारास भेट दिली गंगापूर आगार कडून आगार प्रमुख विजय बोरसे यांनी सत्कार केला.

कार्यक्रमस गंगापूर आगार स,वा नि सुभाष भापकर लेखाकार अतुल बनसोड कामगार संघटनेचे दिलीप आन्ना मनाळ व सर्व संघटनेचे नेते कामगार हजर होते. तसेच कामगार संघटनेचे अध्यक्ष संजय कापसे नंदकिशोर जाधव साईनाथ भालेराव निरज वैजापूरकर सोन्याबापू कळमकर ज्ञानेश्वर कदम भगवान लांडगे गणेश पाटील जालिंदर जायभाय हरिश्चंद्र काळे संतोष इंगळे सुनील कुंढारे राहुल भगत रामनाथ दगडे आदी कामगार हजर होते.

## आ. संजना जाधव यांनी केली जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी

तभा वृत्तसेवा

कन्नड:दि.२७ जानेवारी - शहराला गेल्या वर्षभरापासून नियमित पाणीपुरवठा होत नाही जो होत आहे तोही दूषित असून पिणे योग्य नाही अशा तक्रारी वारंवार आमदार संजना जाधव यांच्याकडे शहरातील नागरिकांनी केल्या होत्या त्या अनुषंगाने दि .२६ रोजी आमदार संजना जाधव यांनी नगर परिषदेचे प्रशासक तथा उपविभाग अधिकारी संतोष गोरड,तहसीलदार विद्याचरण कडवकर यांच्या सह कन्नड चाळीसगाव रोड असलेल्या नगरपरिषदेच्या जलशुद्धीकरण केंद्रा ची पाहणी केली.

२०२० पासून शहरातील जल कुंभाची स्वच्छता केलेली नाही तसेच जलशुद्धीकरण केंद्रा मध्ये लागणारी वाळू ( राजस्थानी ) चार वर्षापासून बदललेली नाही त्याचप्रमाणे ब्लिचिंग पावडर मिक्स करण्याची विद्युत मोटर अनेक दिवसापासून बंद पडलेली निदर्शनात आली हे पाहून आमदार संजना जाधव यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत पंधरा दिवसाच्या आत जलशुद्धीकरण केंद्रा वरील पाणी शुद्धीकरण करणाऱ्या इलेक्ट्रिक मोटर नवीन बसविणे जलशुद्धीकरण केंद्रातली वाळू बदलविणे दर्जे दार ब्लिचिंग व ऐलम वापरणे शहरातील लिकेज पाईपलाईन व व्हाल दुरुस्त करणे जलशुद्धीकरण केंद्र एक दिवस बंद ठेवून ड्राय करून जलशुद्धीकरण केंद्र व शहरातील पाणीपुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाक्या रिकाम्या करून त्या त्वरित स्वच्छ कराव्या तसेच शहराला एक दिवसाआड पाणी द्या.

अशा सूचना उपस्थित नगरपालिकेच्या पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना देऊन दि. २९ जानेवारी रोजी नगरपरिषद येथे या विषयावर आढावा बैठक घेऊन जनता दरबार घेण्याचे कर्मचाऱ्यांना आदेश दिले. यावेळी माजी नगराध्यक्ष विलास वाडेकर,नगरसेवक रत्नाकर पंडित, संतोष पवार,कैलास जाधव,अय्याज शहा उपसभापती जयेश बोरसे,साईनाथ आल्हाड,आदित्य गर्जे, प्रदीप बोडखे, शिवसेनेचे पदाधिकारी नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात. औरंगाबाद**

दि.कि. अर्ज क्र. ३९/२०२५

अर्जदार-१ अशोक रामदास थोरात, वय ४४ वर्ष, धंदा-शेती रा. देवगाव (रं) ता. कन्नड जि. औरंगाबाद २. नितीन अशोक थोरात, वय २६ वर्षे धंदा शिक्षण, रा. देवागाव (रं) ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. विशाल अशोक थोरात, वय २५ वर्षे धंदा शिक्षण, रा. देवागाव (रं) ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. आश्विनी गणेश पोपळघट वय २२ वर्षे धंदा घरकाम, रा. गजानननगर, गारखेडा परीसर, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु. ए. वारे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, क्र. २ ते ४ यांचे वडील असून अर्जदार २ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ-बहीन आहे. अर्जदार क्र. १ यांच्या पत्नी व अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या आई नामे उज्वला अशोक थोरात या होतया त्या दिनांक ०६/१२/२०२४ रोजी मौजे देवगाव (रं) येथे मयत झालेल्या आहे. सोबत मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे.

अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकीय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच महसूल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवून येणे असे सांगीतल्यावरून सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन.

दिनांक २१/०१/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (ए. आय. अवटी) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र- १४/२०२५

अर्जदार : १. सुभाष पिता किसणराव औताडे, वय- ४६ वर्षे, धंदा-शेती रा. बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. संतोष पिता किसणराव औताडे, वय- ४१ वर्षे, धंदा-शेती रा. बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. कांताबाई भ्र. किसणराव औताडे, वय ७५ वर्षे, धंदा-शेती रा. बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. सुनिता भ्र. एकनाथ चव्हाण, वय ५२ वर्षे, धंदा - शेती, रा. बुटटे वाडगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५. अनिता भ्र. शिवनाथ खैरे, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. अंबेडकर गार्डनजवळ, जाधव गल्ली, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ६. संगीता भ्र. कैलास शेळके, वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा. कैवल्यनगर, हिरापुर रोड, चाळीसगांव जि. जळगांव.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे- जिल्हा अधिकारी औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायेदशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ६ यांनी ॲड. एन. वि. थोरात कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत किसनराव पिता रामराव औताडे हे दि.०८.०५.२०२० रोजी मयत झालेले असुन त्यांच्या पश्चात अर्जदार नं. १ ते ६ हे त्यांचे वारस असुन अर्जदार क्र.१ व २ ही मुले व अर्जदार क्र. ३ हि पत्नी असुन अर्जदार क्र. ४ ते ६ हया विवाहीत मुली आहेत. किसनराव पिता रामराव औताडे हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात वारस म्हणुन अर्जदार यांना शासकीय कामे करण्यासाठी, ग्रापं. कार्यालय तसेच तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय, जिल्हाअधिकारी कार्यालय औरंगाबाद, तसेच ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. व तशी मागणी अर्जात केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ६ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन दिनांक. १३/१/२०२५

प्रकरणात पुढील तारीख : २०.०२.२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**विद्यमान श्रीमती व्ही.एन. काटकर मॅडम साहेब, दिवाणी न्यायाधीश' क' स्तर साहेब कन्नड, यांचे न्यायालयात**

सी.एम.ए. ४२/२०२५ — पुढील तारीख १७/०२/२०२५

अर्जदार : १) भानुदास सर्जेराव सोनवणे, वयः ७३ वर्ष धंदाः शेती, रा देवगाव (रंगारी), तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), २) परीगाबाई आबाराव निकम, वयः ७४ वर्ष धंदाः गृहिणी, रा गव्हाली, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) २) मनोहर तुकाराम घुले, वयः ५५ वर्ष धंदाः शेती, रा चिंचखेडा खुर्द, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

विरुद्ध

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

विषय :- वारस हक्क प्रमाणपत्र (लीगल हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने त्याचे वकील श्री संदीप ए शिरसे यांचेमार्फत या न्यायालयात अर्जदार ही वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदारांचे मयत आई नामे कै. गयाबाई सर्जेराव सोनवणे असून त्यांचा मृत्यू दिनांक ११/०४/२०२१ रोजी मेडिकल कॉलेज हॉस्पिटल औरंगाबाद येथे मयत (कोविड ने) झाले असून देवगाव रंगारी तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल करत आहे. असे की सदरील प्रकरणात अर्जदार क्रमांक १ हा मयत यांचा मुलगा असून, अर्जदार क्रमांक २ मयत यांची मुलगी आहे. सदरील प्रकरणात मयताची मुलगी नामे सरस्वती तुकाराम घुले ही वारास होते तिचा मृत्यू दिनांक १०/०७/२०२० रोजी झालेला असून त्यांचे पश्चात त्यांचा मुलगा गैरअर्जदार क्रमांक २ हा वारस आहे. मयत सरस्वती तुकाराम घुले यांचे मृत्यू प्रमाणपत्र सोबत दाखल करत आहे. असे की, सदरील अर्जदाराशिवाय मयत वडील नामे कै. गयाबाई सर्जेराव सोनवणे यांना इतर कोणीही वारस नाही तसेच रा देवगाव (रंगारी), तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे शैक्षणिक अथवा सरकारी कार्यालय (तलाठी / ग्रामपंचायत, तहसील इत्यादी.) यासाठी अर्जदार यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केले आहे. सबब अर्ज दाखल करण्यास कारण घडले.

सबब या जाहीर प्रकटना द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कुणाचाही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा आपल्या विधिज्ञा मार्फत मा. न्यायालयात आक्षेप सादर करावा मुदतीत आक्षेप न आल्यास वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

दिनांक २७/०१/२०२५

आदेशावरून

क लिपिक — सहायक अधीक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये ७६ व्या प्रजासत्ताक दिनी महावृक्षारोपण अभियानांतर्गत १२५ झाडांचे वृक्षारोपण



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २७ जानेवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल सेठ मोतिलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिनी १२५ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम झाल्यानंतर शाळेचे नविन वास्तुच्या प्रांगणात 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे बाळु स्वामी सर, व शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला सर, पालक , विद्यार्थी, शिक्षक, पत्रकार , पोलिस बांधव, गावातील जेष्ठ नागरीक यांच्या हस्ते १२५ विविध फळ व फुल झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षरोपण केल्यावर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. वातावरणात वृक्षरोपण व संवर्धन करणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे. विद्यार्थींनी आपल्या पालकांसोबत झाडे लावुन त्याचे संवर्धन करु असे आपल्या शिक्षकांना व पालकांना सांगितले. या वृक्षरोपनामध्ये पालकांना व विद्यार्थांना अल्पोपहाराचे नियोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडण्यासाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे नवमतदार जनजागृती अभियान पथनाट्य



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२७ जानेवारी

येथील अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाच्या विद्यार्थ्यांनी पंचायत समिती सोयगाव व महाविद्यालय परिसर येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त मतदार जनजागृती अभियानांतर्गत पथनाट्य सादर केले.या पथनाट्यमध्ये मतदार नाव नोंदणी, व्हीव्हीपॅट,कर्तव्यदक्ष नागरिक व आर्थिक प्रलोभणाला बळी न पडणे यासारख्या विषयवार नागरिकांचे प्रबोधन करण्यात आले. या पथनाट्याची संहिता लेखन,संवाद प्रा.स्वाती देशमुख यांनी केले.

विद्यार्थ्यांना पथनाट्य सादर करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,कनिष्ठ विभागप्रमुख डॉ. उल्हास पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

पथनाट्यासाठी डॉ.एस.एल. पाटील, टी.आर.शेख, ए.टी. मानकर, आर.टी.जाधव, बी.ए.पाटील, स्वाती देशमुख, अश्विनी काळे व इतर प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. पथनाट्य पाहण्यासाठी पंचायत समितीचे अधिकारी वर्ग, गावातील नागरिक,महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे प्रजासत्ताक दिन साजरा

तभा वृत्तसेवा बिडकीन दि.२७ जानेवारी पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे सरपंच सलीम महंमद पठाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व जि.प.शाळेत विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला प्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी आशाताईं तुपे,उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण,इलियास पठाण,अशोक गोरे,अहेमद पठाण,रविंद्र गोरे,संदिप चाव्हरे,रेखा इंदापुरे,मीरा हाडे,गायत्री तुपे,कांचन बिडकर,मीना माळवे,कोमल निकम,मीनाक्षी धुमाळ,अनिता पठारे,जाधव सर,तेजस जाधव दिलीप गोरे,गणेश गायकवाड,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ अदि गावकरी आदींची उपस्थित होते.

### सोयगाव - शेंदुर्णी रस्ता होणार गुळगुळीत, आ.अब्दुल सत्तार यांचाहस्ते कामाचे उद्घाटन संपन्न

## सोयगावच्या रस्ते विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही : आ.अब्दुल सत्तार



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२७ जानेवारी

माजीमंत्री,आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने मंजूर शेंदुर्णी - सोयगाव - हळदा रस्ता तसेच सोयगाव - वरखेडी बु. रस्ताच्या कामांचे भूमिपूजन आ.अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.सोयगाव - शेंदुर्णी रस्त्यासाठी ३ कोटी ५० लाख तर सोयगाव वरखेडी बु रस्त्यासाठी आ. अब्दुल सत्तार यांनी ७५ लाख रुपयांचा निधीला मंजुरी मिळवून दिली. यामुळे सोयगाव - शेंदुर्णी रस्ता गुळगुळीत होणार असून सोयगाव वरखेडी बु रस्त्याचे काम होणार आहे.

शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून सोयगाव तालुक्यात विकासाची कामे केली. सोयगाव चाळीसगाव रस्त्यांसह इतर प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण , मजबुतीकरण व डांबरीकरण केले. उर्वरित रस्त्यांच्या कामासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी यावेळी दिली.

सोयगाव येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात भूमिपूजन सोहळा निमित्त आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत सभा पार पडली.यावेळी उपस्थितांना संबोधित करतांना आ.अब्दुल सत्तार बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, उबाठा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा माजी सभापती राजेंद्र राठोड, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव तायडे, उपसभापती दारासिंग चव्हाण, संचालक नंदकिशोर सहारे, नगराध्यक्षा आशाबी तडवी,उपनगराध्यक्षा सुरेखाताई प्रभाकर काळे,माजी जि.प.सदस्य गोपीचंद जाधव गटनेता अक्षय काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास दामू अण्णा गव्हाणे ,जयराम चिंचपुरे, श्रीरंग पा.साळवे,कौतिकराव मोरे,सतीश ताठे,विश्वास दाभाडे, राजाराम पाडळे,संदीप राऊत,रमेश लाठी,भाऊराव लोखंडे, शेख जावेद,शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार,नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ,शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, शिवाप्पा चोपडे,राजू बाबा काळे,सांडू तडवी,रमेश जावळे, शांताराम चौधरी,माजी सभापती धरमसिंग चव्हाण, द्रोपदाबाई सोनवणे,सुरेखाबाई तायडे,सुशिलाबाई इंगळे, शिवसेना शहरप्रमुख संतोष बोडखे,फिरोज पठाण,जीवन पाटील,राहुल सपकाळ,राजू मिया देशमुख,सलीम खा पठाण,डॉ.देशमुख,पंकज जयस्वाल,मोतीराम पंडित,पांडुरंग जैवळ,शिवदास राजपूत,भारत तायडे,श्रावण राठोड,रमेश गावंडे,गुलाब राणा,ज्ञानेश्वर वरांगणे,भगवान वरांगणे, कुणाल राजपूत,सुरेश चव्हाण,विजय तायडे,इलियास पठाण,हरिभाऊ चव्हाण,विशाल चव्हाण,अमोल मापारी, राधेश्याम जाधव,गणेश राठोड,रमेश भंगी,दिलीप देसाई, महंमद देशमुख,सांडू मानसिंग,विकास काळे,मकरंद राठोड, समाधान काळे,नगरसेवक रउफ देशमुख,दीपक पगारे, अशोक खेडकर,राजू दुतोंडे,भगवान जोहरे,कबीर शहा, रउफ शेख,भगवान कुडके,किशोर मापारी,हर्षल काळे, संदीप सुरडकर,डॉ.हर्षल सोळंके,नारायण घनगाव सिताराम जाधव,समाधान काळे,रवींद्र बावस्कर,विलास शिंदे,शेख मुख्तार,मेघराज राठोड आदींसह परिसरातील शेतकरी, नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## महारक्तदान शिबिरात जिल्ह्यात १२६६ रक्तपिशव्यांचे संकलन



छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन तसेच अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने २४ जानेवारी २०२५ रोजी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात केमिस्ट अँड ड्रगिस्टचे अध्यक्ष नितीन देशमुख आणि सचिव विनोद लोहाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरामध्ये जिल्ह्यात एकूण १८ केंद्रांवरून १२६६ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

शिबिराचे उदघाटन महाराष्ट्र राज्याचे ओबीसी विकास, दुग्धविकास आणि उर्जा नूतनीकरण मंत्री नामदार अतुलजी सावे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा व्यापारी महासंघाचे संजय कांकरिया, शिवशंकर स्वामी, लक्ष्मीनारायण राठी, जयंत देवळाणकर, एमसीटीसीचे आदेशपाल सिंगजी छाबडा, आणि कॅटचे अजयभाई शहा आणि मॅकिआचे उपाध्यक्ष प्रफुल्ल मालानी यांच्यासह अन्न व औषध प्रशासनाच्या औषध निरीक्षक सौ अंजली मिटकर मॅडम प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्री.अभिजित देशमुख, कचनेर जैन मंदिर ट्रस्टचे श्री. भरत ठोळे आणि श्री. ललित पाटणी यांचीही यावेळी विशेष उपस्थिती होती

तसेच लायन्स क्लबचे राजकुमार टिबडीवाला, भगवानदास काबरा, विनोद अग्रवाल, आणि रमेश सोनी यांनी देखील या उपक्रमास मोलाचे योगदान दिले. सोयगाव येथील शिबिराचे उदघाटन खासदार मा. कल्याणजी काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जेष्ठ नेते व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रंगनाथ बाबुरावजी काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मनोहर कोरे यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली तर नियोजन संजय लोढा आणि महावीर दोशी यांनी केले,

तसेच संघटनेचे उपाध्यक्ष नंदकुमार काळे, सागर पाटील कोषाध्यक्ष निखिल सारडा, सहसचिव सुनील देशमुख, किरण जोशी तसेच कार्यकारिणी सदस्य बाबुराव सोनवणे, कपिल टिबडीवाला, रईस शेख वसंत भराड, हरीश काबरा, सचिन मुगदिया, प्रभू गिरी, सुरेश बोरसे, अशोक धस प्रवीण तिवारी आणि देविदास मगर यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी अथक प्रयत्न केले.

याशिवाय, प्रभाकर बकाल चेतन पांडे, युनूस शेख संजय शहापूरकर, राजेंद्र सेठ, योगेश गांगुर्डे निलेश राठी आणि रितेश छाजेड, अब्दुल मजीद, कारी हमीद, मधुकर तावडे, आप्पासाहेब,निंबाळकर विनोद ठोंबरे तसेच असंख्य फार्मासिस्ट व केमिस्ट बांधवांनी शिबिराच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला. अध्यक्ष नितीन देशमुख आणि सचिव विनोद लोहाडे यांनी या उपक्रमात योगदान देणाऱ्या सर्व रक्तदाते, स्वयंसेवक आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे मनः पूर्वक आभार मानले आणि भविष्यात अशा सामाजिक उपक्रमांमध्ये अधिकाधिक सहभाग वाढवण्याची अपेक्षा व्यक्त केली.

### संघ हीच जीवनगाथा



अलकः- (२५) **कवच**

दिनांक १ जानेवारी १९३८ ला काटोल येथील नागपूर जिल्हा शिबिराचा समारोप करताना लोकनायक बापूजी अणे म्हणाले एका बाजूने औदासिन्याचा खडक व एका बाजूने विरोधाची माती पोखरीत रा.स्व. संघाची नदी प्रभावीपणे वाहते आहे. त्यामुळे सर्वांनाच संघाशी मिळते जुळतेच घ्यावे लागेल असा विश्वास त्यांनी प्रगट केला होता. ते म्हणाले रा.स्व संघ ही संघटना म्हणजे राष्ट्राचे कवच आहे. समाजाभिमुख स्वभावाचे डॉक्टर माझ्या समाजाकरता मी आहे ही भावना विसरून माझ्या करिता समाज आहे या भावनेला कवटाळा असा आग्रह धरतात. मी व राष्ट्र दोन्ही एकच असे मानून राष्ट्र व समाज यांच्याशी जो तन्मय होतो तोच खरा राष्ट्रसेवक असतो. मी एक माणूस. माणूस हा समाजशील प्राणी आहे. तेव्हा समाज जिवंत राहील तरच मी जिवंत राहू शकेल. यासाठी विश्वासाने लक्षपूर्वक मी माझ्या स्वभावाची तपासणी करेल असा निश्चय करा.

मी- समाज - राष्ट्र म्हणजेच हिंदूंचा हिंदुस्तान आहे. त्यासाठी संघ म्हणजे राष्ट्राचे कवच आहे.

अभिप्राय

लेखन कौशल्य शिस्तबद्ध आहे. वाचतांना कुठेही लिंक तुटणार नाही याची योग्य काळजी घेतली गेलीय.. स्वयंसेवक व इतरांसाठी खुप उद्बोधकलेखमालीका आहे. विस्तृतपणे सगळे बिंदु व्यवस्थित समजतात.. सर्वात महत्वाचे म्हणजे छोटे छोटे भाग केल्याने कोणीही वाचतांना कंटाळत नाही .पुढच्या भागात काय असेल याची उत्कंठा लावणे ज्या लेखकाला जमले तोच यशस्वी लेखक. सौ. काकुंनी हा समतोल अगदी व्यवस्थित सांभाळला आहे. काकुंना नमस्कार आणि या मालिकेबद्दल धन्यवाद सांगा... समाजाला अतिशय आवश्यक असलेली मालिका योग्य वेळेत सुरु केल्याबद्दल सौ. काकुंचे अभिनंदन ..

श्रीपाद महाशब्दे
Mobile 9822682467,9960277538

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## एमजीएममध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला प्रजासत्ताक दिन

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ : भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन महात्मा गांधी मिशनच्यावतीने एमजीएम स्टेडियम येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंढे यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. श्री. मुंढे यांनी ध्वजारोहण झाल्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंढे म्हणाले, आपण ज्याही ठिकाणी काम करत असू त्या ठिकाणी आपण आपले काम प्रामाणिकपणे करत राहिले पाहिजे. पाण्याचा प्रश्न येत्या काळामध्ये महत्त्वपूर्ण ठरणार असून सर्वांनी यावर काम करणे आवश्यक आहे. आज एमजीएम विद्यापीठाची प्रगती पाहून माझे डोळे सुखावले आहेत. या संस्थेतून उद्याची सत्शील आणि सौजन्यशील माणसे घडतील, या विश्वासासह सर्वांना भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देतो.

पथ संचलनातील उत्कृष्ट पथकाच्या महाविद्यालयाच्या संघाला मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या प्रजासत्ताक दिन सोहळ्यास कुलपती अंकुशराव कदम, श्रीमती अनुराधाताई कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, एमजीएम परिवारातील सर्व सदस्य, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावर्षी 'स्वर्णिम भारत - विरासत और विकास' ही प्रजासत्ताक दिनाची थीम होती. एमजीएमच्या विविध संस्थेतील विद्यार्थ्यांनी या आधारावर विविध देखावे सादर केले. यावेळी देशभक्तिपर गीते व वृंदगान क्लोवर डेल स्कूल आणि फर्स्ट स्टेप स्कूल शाळेतील विद्यार्थी आणि गायक राहुल खरे व भक्ती बनवस्कर यांच्या टीम यांनी सादर केले. आज झालेल्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात संभाजी चव्हाण या मल्लखांबपटू विद्यार्थ्याने प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी दाशरथे यांनी केले.

### हृदयविकाराच्या झटक्याने सुरक्षा गार्ड चा मृत्यू

तभा वृत्तसेवा



बिडकीन दि २७ जानेवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील डीएम आय सी मध्ये सुरक्षा गार्ड चा मृत्यू सविस्तर माहिती अशी की बिडकीन येथील डी एम आय सी मध्ये एम पवार सेक्युरिटी सर्विसेस मध्ये सोमनाथ दादासाहेब भोजने वय ३८ वर्षे रा गेवराई बाशी काही महिन्यापासून सुरक्षा गार्ड म्हणून कार्यरत होते दि २५ जानेवारी रोजी रात्रपाळीसाठी सात वाजता ड्युटीवर गेले असता दि २६ जानेवारी रोजी सकाळी सात वाजता ड्युटीवर असलेल्या सुरक्षा गार्ड यांनी सोमनाथ भोजने यांना झोपलेल्या अवस्थेमध्ये आढळून आले , भोजने यांना ग्रामीण रुणालय बिडकीन येथे उपचारासाठी दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ अस्मा शेख यांनी तपासून मृत्यू घोषित केले व शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आली या घटनेची बिडकीन पोलीस ठाण्यात नोंद घेण्यात आले असून पुढील तपास बिडकीन पोलीस करीत आहे.

### रेखा भवर यांचे निधन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२७ जानेवारी



शहरातील नारळीबाग येथील रहिवाशी रेखा रामदास भवर (वय.४४) यांचे सोमवार रोजी सकाळी ७:०० वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार रोजी दुपारी २:०० वा. अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात वडील,दोन भाऊ,असा परिवार आहे.



### जाहीर प्रगटन

**पुना ०१/०३/२०२५ मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ५६/२०२५

अर्जदार : १. अशोक रामनाथ चापे, वय. ५२ वर्ष धंदा. शेती रा. मुरमी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर २. एकनाथ रामनाथ चापे, वय. ४६ वर्ष धंदा. शेती रा. मुरमी ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर ३. पदमाबाई नामदेव चव्हाण, वय. ६२ वर्ष धंदा. शेती रा. भिव धानोरा ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४. तुळसाबाई संजय राजुळे, वय. ५९ वर्ष धंदा. शेती रा. मुरमी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

-: विरूद्ध :-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, असे की, अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडिल नामे रामनाथ दगडू चापे हे दि. १०/०८/१९८३ रोजी मौजे पेंडापूर ता. गंगापूर येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार नं. १ ते ४ यांची आई व मयत रामनाथ दगडू चापे यांची पत्नी नामे मालनबाई रामनाथ चापे ही देखील दि.२२/०१/२०१९ रोजी मौजे दहेगांव ता. गंगापूर येथे मयत झाली आहे. त्यामूळे अर्जदार हे मयत रामनाथ दगडू चापे व मयत मालनबाई रामनाथ चापे यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत मयत रामनाथ दगडू चापे व मयत मालनबाई रामनाथ चापे यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत रामनाथ दगडू चापे व मयत मालनबाई रामनाथ चापे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्द्धीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत रामनाथ दगडू चापे व मयत मालनबाई रामनाथ चापे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्ती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक सहायक अधिकक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ४८/२०२५

अर्जदार : १. रावसाहेब महादु काळवणे, वय. ४४ वर्ष धंदा. शेती रा. १२, सावता मंदिर जवळ, ओल्ड रांजणगांव शे.पु. रांजणगांव शे.पु. ता. गंगापूर जि.छ.संभाजीनगर २. भिमाबाई भ्र. रमेश शिरसे, वय ६३ वर्ष धंदा. शेती रा. देवगांव रंगारी ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर ३. शोभाबाई पिता. महादू काळवणे, वय. ६२ वर्ष धंदा. शेती रा. रांजणगांव शे.पु. ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४. चंद्रकलाबाई भ्र. बाबूराव फाळके वय. ६० वर्ष धंदा, शेती रा. अंधारी ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर ५. गंगुबाई भ्र. रायभान दापके वय. ५३ वर्ष धंदा. शेती रा. मालीवाडा ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर ६. तुषार भास्कर काळवणे वय. २० वर्ष धंदा. शिक्षण रा. रांजणगांव शे.पु. ता. गंगापूर जि.छ.संभाजीनगर ७. रोहित भास्कर काळवणे वय. १८ वर्ष धंदा. शिक्षण रा. रांजणगांव शे.पु. ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ८. कविता भ्र. भास्कर काळवणे वय. ४० वर्ष धंदा. शेती रा. रांजणगांव शे.पु. ता. गंगापूर जि.छ.संभाजीनगर

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री. डि. ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, असे की, अर्जदार नं. १ ते ५ यांची आई तसेच अर्जदार नं. ६ ते ७ यांची आज्री व अर्जदार नं. ८ यांची सासू नामे मैनाबाई महादु काळवणे हे दि. ३१/०५/२०२२ रोजी मौजे रांजणगांव शे.पु. ता. गंगापूर येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांचे पति नामे महादु काळवणे हे देखील त्याअगोदरच सन १९६१ च्या दरम्यान मयत झाले असून तेव्हा ग्राम पंचायत नसल्यामूळे मयत महादु काळवणे यांच्या मृत्यूची नोंद ग्राम पंचायत रेकॉर्डला नाही. अर्जदार हे मयत मैनाबाई महादु काळवणे यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत मैनाबाई महादु काळवणेयांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत मैनाबाई महादु काळवणे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत मैनाबाई महादु काळवणे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्दती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १३/२०२५

१/- लक्ष्मीबाई शेषराव पाटील (जाधव), वय ६२ वर्ष, धंदा घरकाम, रा. बनोटी, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/- सुनील शेषराव पाटील (जाधव), वय ४१ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे, ३/- छाया कृष्णा साबळे, वय ४३ वर्षे, धंदा. धरकाम, रा. वरीलप्रमाणे. ४/- उषाबाई समाधान चव्हाण, वय ३९ वर्षे, धंदा. घरकाम, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत शेषराव बारकू पाटील यांचा दि. ०४/११/२०२३ रोजी मौजे बनोटी, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मयत असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ एकमेव हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांनी मयत शेषराव बारकू पाटील यांचे वारस असुन त्यांना मयत शेषराव बारकू पाटील यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. २३/१/२५ / २०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता. २४/२/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर.) सोयगाव यांचे न्यायालयात जि. छ. संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २२/२०२५

१/-कौशल्याबाई विठ्ठल कोतवाल, वय ६५ वर्षे, धंदा गृहिणी, २/- ज्योती छत्तरसिंग कोतवाल, वय ३२ वर्षे, धंदा गृहिणी, ३/- तनिष्का उत्तरसिंग कोतवाल, वय १५ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क ज्योती उत्तरसिंग कोतवाल ४/- अनुष्का छत्तरसिंग कोतवाल, वय १३ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क ज्योती उत्तरसिंग कोतवाल ५/- गौरव छत्तरसिंग कोतवाल, वय १२ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क ज्योती छत्तरसिंग कोतवाल, ६/- दिव्या छत्तरसिंग कोतवाल, वय ०८ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा. क ज्योती उत्तरसिंग कोतवाल, सर्व रा. काळेनगर सोयगाव, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर

विरूद्ध

कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत छत्तरसिंग विठ्ठल कोतवाल यांचा दि. २०/०३/२०२४ रोजी मौजे सोयगाव, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मयत असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार एकमेव हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी मयत छत्तरसिंग विठ्ठल कोतवाल यांचे वारस असुन त्यांना मयत छत्तरसिंग विठ्ठल कोतवालयांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी २१/०१/२०२५ सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

आदेशावरून

क. लिपिक सहाय्यक अधीक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर गंगापुर जि औरंगाबाद**

दि.कि. अर्ज कं ४४३/२०२४

पुढील तारीख १७-२-२०२५

अर्जदार : १) कल्याण जगन्नाथ खंडागळे, वय ६६ वर्षे धंदाः शेती रा. पखोरा, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद. २) सुखदेव जगन्नाथ खंडागळे, वय ६० वर्षे धंदाः शेती वरील प्रमाणे ३) सविता भ्र भागचंद खंडागळे, वरील प्रमाणे.

गैरअर्जदारः- निरंक

विरुध्द

प्रकरणः- निरंक बॉम्बे रेगुलेशन भारतीय कायदयाप्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

महोदय,

विधीज्ञ ॲड पी जी जाधव यांनी अर्जदारकरीता खालील प्रमाणे अज सादर केला की, १. असे की, अर्जदार क. १ ते ३ हे मौजे पखोरा, ता. गंगापूर येथील कायमचे रहिवासी आहे. अर्जदाराचे वडिल नामे जगन्नाथ यशवंता खंडागळे हे मौजे पखोरा, ता. गंगापूर येथील रहिवासी होते व ते शेतीधंदा करून आपला व कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. जगन्नाथ यशवंता खंडागळे हे दिनांक २३/०७/२०२३ रोजी मौजे पखोरा, ता. गंगापूर येथे मयत झाले. जगन्नाथ यशवंता खंडागळे यांना एकूण तीन मुले अर्जदार क्र.१ व २ आणि भागचंद जगन्नाथ खंडागळे हा दिनांक ०९/०२/२०१० रोजी मौजे पखोरा येथे मयत झाला आहे. मयत मुलगा भागचंद यास त्याची विधवपत्नी अर्जदार क.३ सविता भागचंद खंडागळे हि एकमेव वारस आहे. अर्जदार क. १ ते ३ हे मयत जगन्नाथ यशवंता खंडागळे यांचे एकमेव वारसदार आहेत. मयत जगन्नाथ यांची पत्नी नामे रेउबाई भ्र जगन्नाथ खंडागळे हया देखिल दिनांक ०५/०५/२०२१ रोजी मयत झालेल्या आहे. मयत, जगन्नाथ यशवंता खंडागळे यांना अर्जदारां शिवाय इतर कोणीही वारस नाही.

२. असे की, जगन्नाथ यशवंता खंडागळे यांचे अर्जदार क. १ ते ३ हे एकमेव वारसदार आहे. अर्जदार क. १ ते ३ हे मयत जगन्नाथ यशवंता खंडागळे यांचे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये कार्यवाहीसाठी मयताचे वारस असल्याचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार क. १ ते ३ यांना मयत जगन्नाथ यशवंता खंडागळे यांचे वारस असल्याचे वारसाचे प्रमाणपत्र (Heirship Certificate) वारसाचे प्रमाणत्राची आवश्यकता आहे.

३. असे की, अर्जदार क. १ ते ३ यांनी मयत जगन्नाथ यशवंता खंडागळे यांचे मृत्यूचे प्रमाणपत्र व वारसाचे प्रमाणपत्र सदर अर्जासोबत मा. न्यायालयाचे अवलोकनास्तव दाखल केले आहे. त्याच प्रमाणे अर्जदाराची आई नामे रेणुबाई जगन्नाथ खंडाखळे हया देखिल मयत झालेले असुन त्यांचे देखिल मृत्यूचे प्रमाणपत्र मा. न्यायालयाचे अवलोकनास्तव सादर करीत आहे.

४. असे की, अर्जदारांचे वडिल जगन्नाथ हे दिनांक २३/०७/२०२३ रोजी मौजे पखोरा, ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे व त्यांचे वारस अर्जदार क. १ ते ३ हे आहे. त्यामुळे अर्जदार क. १ ते ३ मयत जगन्नाथ यशवंता खंडागळे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात कार्यवाहीसाठी वारसाचे प्रमाणपत्र मिळणे आवश्यक व कायदेशिर आहे.

करीता हे जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस प्रसिध्द केले आहे तरी ३० दिवसांच्या आत किंवा १७-२-२०२५ च्या आत मा कोर्टास किंवा विधीज्ञाना कडे कागदपत्रासह आक्षेप नोंदवावा अन्यथा प्राप्त पुराव्यानुसार विनंती प्रमाणे अर्ज निकाली काढला जाईल. करीता हे जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस. दिनांक २४/०१/२५

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
मा दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापुर

## रोखठोक


दिनेश गुणे

# अध्यात्म, वारसा आणि विकास

या देशाची सांस्कृतिक मानचिन्हे असलेल्या परंपरा पुनरुज्जीवित करणे, त्यांना जागतिक ओळख निर्माण करणे आणि त्यांना मान्यता देणे ही आजपर्यंत सरकारी प्राधान्यक्रमाची बाब नव्हती. उलट, या परंपरा आणि देशाची सांस्कृतिक ओळख पुसण्याचेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न झालेले दिसतात. आपल्या शिक्षण पद्धतीनेही याला हातभारच लावला आणि नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाने ही चूक सुधारण्याकरिता पहिले पाऊल टाकले. आता भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी या देशातील अभ्यासकांना परदेशी विद्यापीठे गाठण्याची गरज राहणार नाही, हा या सुधारणेचा महत्त्वाचा टप्पा मानता येईल. हे काम सहजासहजी झालेले नाही. देशाच्या सांस्कृतिक वारशाचे पुनरुज्जीवन करण्याची एक नियोजनबद्ध मोहीम गेल्या दशकभरात देशात सुरू झाली आहे. या मोहिमेत शिक्षण तीर्थस्थळांच्या विकासाला प्राधान्य आहे आणि संस्कृती हे या मोहिमेचे केंद्रस्थान आहे. वारसा जपताना, वारशाची ओळख जगाला करून देताना विकासही साधला जाईल, हा या नव्या मोहिमेचा वेगळा चेहरा आहे. आपल्याला जी काही दिसते तेवढीच आपली परंपरा किंवा संस्कृती नाही, तर संपूर्ण जगाला आपल्यामध्ये दिसते, ती आपली संस्कृती असते. म्हणूनच आपला सांस्कृतिक वारसा जगासमोर ठेवून संपन्न संस्कृतीची ओळख जगाला घडविण्याचे प्रयत्न आणि त्यातून विकास साधण्याचे धोरण राबविले जात आहे. सध्या उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्याकडे या धोरणाच्या चष्म्यातून पाहिले, तर ही मोहीम किती सूक्ष्मपणे आखण्यात आली आहे आणि किती धोरणीपणाने राबविली जात आहे, याची खात्री पटते. पाच वर्षांपूर्वी, २०१९ मध्ये प्रवासी भारतीय दिनाच्या निमित्ताने व केंद्र सरकारच्या भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या (आयसीसीआर) पुढाकाराने जगभरातील अधिकाऱ्यांना, शिष्टमंडळांना व राजदूतांना प्रयागराज कुंभमेळ्याचा अनोखा अनुभव घेता आला होता. सध्या सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्यातही हीच परंपरा राखली गेली आहे आणि जगभरातील अनेक शिष्टमंडळे या सोहळ्यात हजेरी लावत आहेत. हा केवळ पाहण्याचा सोहळा नाही, तर अनुभवण्याचा आणि त्यातून परंपरा व संस्कृतीची ओळख करून घेण्याचा सोहळा आहे, हे एव्हाना सरकारच्या धोरणातून स्पष्ट झाले असून वारशाचे संवर्धन करताना विकास साधण्याचा एक वेगळा प्रयोग या निमित्ताने जगासमोर आला आहे. म्हणून उत्तर प्रदेशातील योगी सरकार आणि या प्रयोगास प्रोत्साहन देणाऱ्या केंद्रातील मोदी सरकारच्या धोरणाचा वेगळ्या नजरेने अभ्यास करावा लागेल. आधुनिक प्रशासन आणि समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन यांचे आदर्श संतुलन राखण्याचा प्रयोग म्हणूनही या सोहळ्याची नोंद होणार आहे. १४४ वर्षांतून एकदा येणाऱ्या या महाकुंभ मेळ्यासाठी सुमारे ४५ कोटी यात्रेकरू, भाविक व प्रेक्षक दाखल होतील हे गृहीत धरून सोहळास्थानाचे नियोजन करण्यात आले आहे. हा भव्य सोहळा केवळ रामभरोसे पूर्ण होणार नाही, येथील प्रत्येक क्षणावर सरकारच्या सर्व यंत्रणांचे नियंत्रण व काटेकोर नजर राहील, अशी व्यवस्था उभारण्यात आली आहेच; यातून होणाऱ्या आर्थिक उलाढालीचा थेट फायदा विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करण्याकरिता होणार आहे. प्रयागराज महाकुंभसारख्या सांस्कृतिक सोहळ्याचा वारसा अशा रीतीने संपन्न करण्याच्या प्रयत्नांची विकासासोबत सांगड घालण्याचा हा प्रयोग आहे, म्हणूनच आता अशा प्रयोगांकडे परंपरांच्या चष्म्यातून न पाहता भविष्याशी सांगड घालणाऱ्या धोरणाचा भाग म्हणून पाहण्याची गरज आहे.

या महामेळ्याकरिता होणाऱ्या गर्दीच्या नियोजनाची आणि व्यवस्थापनाचीही काटेकोर आखणी करण्यात आली आहे. पायाभूत सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षा आणि भाविकांच्या सुविधा यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. २०१९ मध्ये अर्ध कुंभमेळ्याच्या निमित्ताने या स्थळी सुमारे २१ कोटी भाविक सहभागी झाले होते. त्याच्या नियोजनातील अनुभव आणि त्रुटींचाही काटेकोर विचार करून नव्या नियोजनाची आखणी करण्यात आल्याने, कुंभमेळ्याच्या सांस्कृतिकतेला अर्थकारणाचा आधार मिळाला आहे. सुमारे साडेसात हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून उभारण्यात आलेल्या सुविधांचा परतावा म्हणून उत्तर प्रदेश सरकारला कर, भाडे आणि अन्य शुल्कांद्वारे २५ हजार कोटींचे उत्पन्न मिळेल, असा अंदाज आहे. कदाचित ही उलाढाल याहूनही अधिक असेल, असाही दावा केला जात आहे. धार्मिक पर्यटनाचे औचित्य साधून आर्थिक विकासाचे मॉडेल बनविण्याच्या या प्रयोगाला आता नव्या मिती प्राप्त झाल्या आहेत. वारसा आणि विकास हे हातात हात घालून चालत राहिले, तर विकासाची वाटचाल अधिक गतिमान होते, हे दाखविण्याच्या प्रयत्नांबरोबरच, जगाला भारताच्या संस्कृतीची ओळख करून देण्याचा नवा मुहूर्त या सोहळ्याने साधला आहे. प्रयागराज येथील त्रिवेणी संगमाच्या काठाचे एका संपन्न, सुविधायुक्त आणि सक्षम वस्तीत रूपांतर करणे हा भारतीय परंपरा, आधुनिक अभियांत्रिकी आणि आध्यात्मिक उत्साह यांचा त्रिवेणी संगम ठरला आहे.

असे महासोहळे आयोजित केले जातात, तेव्हा त्यांच्या प्रयोजनावर प्रश्नचिन्हेही उमटविली जात असतात. ते अपरिहार्यदेखील आहे. जग आधुनिकतेकडे वाटचाल करीत असताना अशा परंपरांच्या पुनरुज्जीवनातून काय साधणार, बुरसटलेल्या परंपरांचे प्रदर्शन कशाला करावे, असा सूरही उमटताना दिसतो. पण या परंपरा बुरसटलेल्या नाहीत, तर त्यांना संपन्नतेचा वारसा आहे, हे सिद्ध करण्याचा सोहळा म्हणूनच त्याची आखणी केली जात आहे, हे दाखवून देण्याच्या या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे होणारी आर्थिक उलाढाल अवश्य ध्यानात घ्यावयास हवी. असे करण्याकरिता अलिकडे काही तुलना कराव्या लागतात. त्यातून या प्रयत्नांचे यश अधिक ठळकपणे अधोरेखित होते. या महाकुंभ मेळ्याच्या निमित्ताने देशभरात सुमारे तीन लाख कोटींची उलाढाल होईल, असा अंदाज आहे. काही दिवसांच्या या सोहळ्याने देशाला काय दिले याचे उत्तर या आकड्यामध्ये दिसते. पाकिस्तानसारख्या देशाची गंगाजळीदेखील दीड लाख कोटींचा आकडा गाठू शकलेली नाही, हे लक्षात घेतले, तर १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी, म्हणजे दीड महिना चालणाऱ्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने होणाऱ्या उलाढालीचे महत्त्व स्पष्ट होते. या



मेळाव्यासाठी येणाऱ्या सुमारे ४५ कोटी भाविकांची संख्या ही अमेरिका आणि कॅनडा या देशांच्या एकूण लोकसंख्येहूनही अधिक असेल. प्रत्येक यात्रेकरू या मेळाव्यात सुमारे पाच ते सहा हजार रुपये खर्च करेल, असे गृहीत धरले, या काळात अडीच लाख कोटींचे चलनवलन होईल आणि भारताच्या दरडोई उत्पन्नात सुमारे एक टक्क्याची भर पडेल. पर्यटन, पाहुणचार, पायाभूत सुविधा आणि अन्य अनेक क्षेत्रांच्या विकासास हा दीड महिन्यांचा सोहळा चालना देणारा ठरेल. लग्नसराई, दिवाळी, होळी, रक्षाबंधन, गणेशोत्सव आदी उत्सवकाळांमध्ये होणाऱ्या एकत्रित आर्थिक उलाढालींच्या ६० टक्के उलाढाल केवळ या दीड महिन्याच्या कुंभकाळात होईल, वारशाची ओळख करून देणारा हा सोहळा विकासाचा आधार ठरेल, हे स्पष्ट होण्याकरिता एवढी तुलना पुरेशी आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने होणाऱ्या ग्राहकोपयोगी वस्तूंच्या विक्रीची उलाढाल सुमारे ५० हजार कोटींचा आकडा गाठेल, असा अंदाज वर्तविला जातो. अन्नधान्ये, खाद्यतेल, दुग्धजन्य पदार्थ, धार्मिक साहित्य, खाद्यपदार्थ, कपडे, पारंपरिक हस्तकला वस्तू यांच्या उलाढालींमुळे हजारो कुटुंबांच्या वार्षिक उत्पन्नाला मोठा हातभार लागेलच; पण देश-विदेशातून येणारे भाविक या निमित्ताने पर्यटनाची पर्वणीदेखील साधणार असल्याने स्थानिक पर्यटन व्यवसायाला बहर येत आहे. उत्तर प्रदेशाला अनेक पर्यटनस्थळांचा वारसा लाभला आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने पर्यटनाच्या क्षेत्रात सुमारे अडीच लाख कोटींची उलाढाल अपेक्षित आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने उत्तर प्रदेशात प्रयागराज क्षेत्राचा ७६ वा नवा तात्पुरता जिल्हा अस्तित्वात आल्याची घोषणा उत्तर प्रदेश सरकारने केली आहे.

सांस्कृतिक वारसा पुनरुज्जीवित केल्याने केवळ धार्मिक भावना सुखावतात असे नाही. या प्रयोगातून समाजजीवनातही आमूलाग्र बदल होतो, अर्थकारणास बळकटी येते आणि रोजगार-उद्योगांच्या नव्या संधी निर्माण होऊन गरजेच्या वस्तूंची मागणी वाढल्याने उत्पादनास चालना मिळते. सुमारे ५०० वर्षांचा एक सांस्कृतिक संघर्ष गेल्या वर्षी पूर्णांशाने समाप्त झाला. अयोध्येतील राम जन्मभूमीच्या जागी असलेली ती वादग्रस्त वास्तू उद्ध्वस्त झाल्यानंतर उभय बाजूंच्या सामंजस्यातून त्या जागी भव्य राम मंदिर उभारण्याचा संकल्प साकार झाला आणि गेल्या वर्षी २२ जानेवारीस या मंदिरात रामललाची प्रतिष्ठापनाही झाली. पाच शतकांचा एक सामाजिक संघर्ष संयमी आणि समंजस वातावरण निर्माण करण्याच्या प्रयत्नांमुळे संपुष्टात आल्यावर अयोध्येला आता तीर्थक्षेत्राचे स्वरूप आले आहे. दररोज लाखो भाविक राम मंदिरातील लोभस मूर्तींच्या दर्शनासाठी अयोध्येत येत असतात. अजूनही या शहरातील अन्य पायाभूत सुविधांची उभारणी सुरू असून येत्या काही महिन्यांत अयोध्या नगरी हे संपूर्ण विकसित शहर म्हणून देशाच्या नकाशावर दिमाखात दिसू लागेल. भाविकांच्या दररोजच्या गर्दीमुळे या शहरातील व्यापार उदीम वाढला आहे. रस्ते, विमानतळ आणि इतर पायाभूत सुविधांच्या कामामुळे दळणवळणास चालना मिळाली असून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. पर्यटकांची गरज असलेल्या पाहुणचार उद्योगासही या शहरात सोन्याचे दिवस आले आहेत. देशाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येस लोटणाऱ्या भाविकांच्या सामाजिकतेस साजेशा सोयी उभ्या राहात असल्याने, विविधतेतील एकतेचे एक अभिनव दर्शन या शहरात घडू लागले आहे. सध्या प्रयागराज येथे सुरू असलेल्या कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांची पावलेदेखील आपोआप अयोध्येकडे वळू लागली आहेत. त्यामुळे केवळ अयोध्या आणि प्रयागराजमधीलच नव्हे, तर उत्तर प्रदेशातील आणि देशातील अर्थकारणासही या संधींचे पाठबळ मिळाले आहे. धर्माच्या चष्म्यातून पाहिले तर या शहरात भाविकतेचे आणि सांस्कृतिक वारशाचे अनोखे दर्शन पाहावयास मिळते आणि अर्थकारणाच्या चष्म्यातून पाहिले तर अयोध्येतील विकासाचे चित्र स्पष्ट दिसते. राम मंदिरामुळे या शहराला तीर्थस्थळाची धार्मिक ओळख मिळाली आहेच; पण अर्थव्यवस्थेला मिळालेल्या चालनेमुळे येथील जीवनमानही संपन्नतेच्या वाटेवर वळू लागले आहे.

तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरिता मोदी सरकारने देशात सर्वत्र अनेक योजना आखल्या आहेत. भारतीय जीवनशैलीत तीर्थयात्रा, धार्मिक विधी आणि पूजाअर्चा यांचे स्थान अजूनही अढळ आहे. एका बाजूला भौतिक विकासाची क्षितिजे विस्तारत आहेत आणि नवतेचा स्वीकार करतानाही परंपरांचे जतन करण्याची प्रवृत्तीदेखील समाजाने जपली आहे. मंदिरे आणि तीर्थस्थळांच्या अर्थकारणाचा एकूण अर्थकारणात मोठा वाटा असल्याचे स्पष्ट झाले आहे. देशाच्या एकूण सकल उत्पन्नात धार्मिक पर्यटनाचा वाटा सुमारे अडीच टक्के आहे आणि मंदिरांच्या अर्थकारणाची एकत्रित वार्षिक उलाढाल तीन लाख कोटींहूनही अधिक आहे. शैक्षणिक सहली, सामाजिक सहली आणि धार्मिक पर्यटन या तुलनेत धार्मिक पर्यटनावर भारतीयांचा सर्वाधिक खर्च होतो, असे एका पाहणीतून निष्पन्न झाले आहे. देशातील सरासरी एक भारतीय धार्मिक पर्यटनावर दिवसाकाठी २७१७ रुपये खर्च करतो, शैक्षणिक पर्यटनावर २२८६ रुपये तर सामाजिक पर्यटनावर १०६८ रुपये खर्च करतो. त्यामुळे धार्मिक पर्यटन हा पर्यटन क्षेत्राच्या विकासाचा कणा ठरला आहे. देशातील ५० टक्क्यांहून अधिक हिंदू तीर्थयात्रांच्या परंपरांचे आजही भाविकतेने पालन करतात, त्यामुळे तीर्थक्षेत्रांच्या विकासाची गरज ओळखून मोदी सरकारने देशातील तीर्थक्षेत्र विकासाचा व्यापक कार्यक्रमच हाती घेतला आहे. महासत्ता म्हणून आपले स्थान निर्माण करण्यासाठी आर्थिक महासत्ता म्हणून सक्षम व्हावे लागते. ज्या ज्या गोष्टी आर्थिक संपन्नतेस आधारभूत ठरतील, त्या प्रत्येक गोष्टीचा विकास करताना, सांस्कृतिक वारसा जपण्याचा प्रयोग महासत्तेच्या वाटचालीत महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास आता दुणावत चालला आहे. चार वर्षांपूर्वी, डिसेंबर २०२१ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काशी विश्वनाथ कॉरिडॉरचे उद्घाटन केले आणि जवळपास अडीचशे वर्षांनंतर बाबा विश्वनाथ धामच्या परिवर्तनाची पहाट उगवली. या क्षेत्रास भेट देणाऱ्या भाविक आणि पर्यटकांमुळे काशीच्या अर्थकारणासही गती मिळाली आहे.

संस्कृती हे सामाजिकतेचे उगमस्थान असते. कोणत्याही राष्ट्राची संस्कृती ही त्याचा राजकारणात, व्यवहारांत, आंतरराष्ट्रीय संबंधांत आणि समाजजीवनातील परस्परांसोबतच्या व्यवहारांत प्रतिबिंबित होत असते. आपल्या देशाची संस्कृती हा आपल्या पूर्वजनांकडून देशाला मिळालेला एक अभिमानास्पद वारसा आहे आणि या देणगीबद्दल पूर्वजांचे आभार मानण्यासाठी, आदरभाव व्यक्त करण्यासाठी संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहे. सांस्कृतिक परंपरांना देशाच्या जीवनशैलीच्या केंद्रस्थानी प्रस्थापित करण्याच्या या प्रयत्नांचे प्रतिबिंब अशा सोहळ्यांतून दिसू लागले आहे. भारतीय समाजजीवन सजग आहे. परंपरांचे अंधपणाने पालन करणे या समाजजीवनास मान्य नसते. अशा अनेक अनिष्ट प्रथा, परंपरा समाजजीवनातून पुसल्या गेल्या आहेत. मात्र, ज्या परंपरांनी समाजजीवन समृद्ध केले आहे, त्यांचे पुनरुज्जीवन करून त्या समाजजीवनात प्रस्थापित करताना त्याद्वारे आधुनिक विकास साधणे हा सामाजिक परिवर्तनाचा वेगळा प्रयोग ठरेल. प्रयागराज कुंभमेळ्याच्या आयोजनातही हाच प्रयोग दिसतो. या प्रयोगाच्या यशाकडे भविष्यकाळाच्याही नजरा लागलेल्या असतील, यात शंका नाही.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### कागदी प्यालांवर बंदी घाला

चहाच्या कागदी प्यालांमुळे भटक्या जनावरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या कागदी प्यालांमधून चहा प्यायल्याने नागरिकांच्या आरोग्याससुद्धा गंभीर धोका निर्माण होत असल्याने अशा प्यालांवर शासनाने बंदी घालावी. जागोजागी चहाच्या कागदी प्यालांचा कचरा निर्माण होतो. सर्व चहाच्या दुकानांमधून कागदी प्यालांचा वापर होत आहे. एकाही प्यालावर प्रमाणीकरण केल्याचा शिक्का नसून काहीतर चहा भरल्याबरोबर



वितळू लागतात, इतके ते हलक्या दर्जाचे असतात. शहरात अनेक भटकी जनावरे आहेत. या प्यालाचा सर्वाधिक फटका मोकाट फिरणाऱ्या जनावरांना बसला आहे. प्लॅस्टिक कोटिंग असलेले प्याले वापरण्यास शासनाने यापूर्वीच बंदी घातली आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी होत नाही. प्रत्येक स्टॉलवर, टपऱ्यांवर अशा प्रकारच्या प्यालांचा खच पडलेला दिसतो. काही ठिकाणी तर प्याले गोळा करण्यासाठी व्यावसायिकांनी डबा ठेवलेला आहे. मोकाट फिरणारी जनावरे डब्यामध्ये तोंड घालून सगळे प्याले खातात. चवीला गोड लागत असल्यामुळे जनावरे अशा वस्तूंच्या शोधात गावभर फिरत असतात. सध्या शहरासह जिल्ह्यात काही जनावरे विशेषतः गाई गाभण असल्यासारख्या दिसतात. प्रत्यक्षात त्यांच्या पोटामध्ये कागदी प्यालांचा मोठा गोळा तयार झालेला असून तो पचत नाही. पोटाबाहेर फेकलाही जात नाही, त्यामुळे अशा जनावरांची हालचाल एकदम त्यांना खाण्यासाठी तोंडदेखील नीट उघडता येत नाही. विविध प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव होऊन नाकावाटे, तोंडावाटे घाण स्राव सतत पाझरत असतो. त्यांच्या शेणालासुद्धा अत्यंत दुर्गंधी येते. समोर चारा, घास असे खाद्य असून या जनावरांना खाता येत नाही. ही जनावरे वास घेऊन पुढे निघून जातात. प्रशासनाने तातडीने कागदी प्याले चहासाठी वापरण्यावर तत्काळ बंदी घालून कठोर कारवाई करावी. चहा विकण्यासाठी कागदी प्याले विकण्याला शासनाने बंदी घातली आहे. यापूर्वी सर्व व्यावसायिकांना सूचना देण्यात आली आहे. जनावरांचे आरोग्य या प्यालांमुळे बिघडले आहे.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

### मदत मागण्याच्या नावावर फसवणूक

दैनंदिन जीवनातील कंटाळवाण्या कामातून वेळ काढून माणूस फिरायला जातो. त्यासाठी तो सहलीचे आयोजन करतो. सर्व तयारी वेळेत पूर्ण करून आपल्या सोबत नातेवाईक किंवा मित्रमंडळी घेतो. त्यात लहान-मोठ्यांचा समावेश असतोच. लहानग्याशिवाय सहलीत आनंद येणे कठीणच आहे. आमची ही सहल धार्मिक स्वरूपाची होती. आंध्रप्रदेशातील तिरुपती येथे पोहोचलो. तिकिटांच्या झेरॉक्स काढावयास एक दुकान शोधले. तेलुगू इसमास मी हिंदीमध्ये बोललो, 'झेरॉक्स दिजिये।' त्याने काहीही उत्तर न देता झेरॉक्स काढल्या. मी त्याला 'कुठून प्रवेश करायचा' असा प्रश्न केला? तेव्हा तो तिकीट निरखून पाहू लागला आणि 'तिकीट फेक है' म्हणाला. आम्ही एकदम घाबरलो. 'किस आधारपर यह फेक है।' असे म्हटले तर म्हणाला, 'यहां पर क्यूआर कोड नहीं है, ऐसी हजारो टिकट मेरे पास आती है। किसी ने फेक वेबसाईट बनाकर ठग लिया है।' तरी आम्ही मनाला दिलासा देत प्रवेशद्वाराजवळ पोहोचलो. तेव्हा कळले की आपली फसवणूक झाली. इतके दूर येऊन देवाचे दर्शन नाही. फार वाईट वाटले. सर्वांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. लागूनच असलेल्या बाजारपेठेत आम्ही निरर्थक फिरत होतो. आम्हास एक मराठी जोडपे मिळाले. आम्ही मराठी बोलत असल्याचे पाहून म्हणाले, 'तुम्हास मराठी येते काय?' आम्ही म्हणालो, 'होय.' त्यावर ते आपली कर्म कहाणी सांगू लागले. आमची बॅग चोरी गेली. सर्व पैसे त्यातच होते. सोबत सासू-सासरे आहेत. सोबत लहान बाळ आणि इतर लोक होते. सकाळपासून काहीच खाल्ले नाही. मोबाईलही चोरीस गेला. आम्हास विनंती करू लागले. त्वरित ५०० रुपये काढून दिले. आम्ही पुढे निघून गेलो. नंतर आमच्या लक्षात आले की, आधार कार्डने पैसे काढायचे झाल्यास मोबाईलवर ओटीपी जाईल आणि त्यांच्याकडे मोबाईल नाही म्हणून आम्ही परत फिरलो त्यांना मदत करायला. मदतही केली. त्यांचे प्रवासापुरते पैसे मिळवून दिले. त्यांनी मोबाईल नंबर देऊन पोहोचल्यावर पैसे परत करण्याचे आश्वासन दिले. मागील वर्षी ओंकारेश्वर येथे एक असाच इसम भेटला. आम्ही पती-पत्नी मराठीत बोलत असल्याचे लक्षात येताच तो आमचा पाठलाग करू लागला. विचारल्यावर पहिल्या प्रसंगाप्रमाणे आपली कहाणी सांगू लागला... बॅग व मोबाईल चोरी गेला वगैरे. त्या गर्दीत असे चार ते पाच लोक मिळाले. कहाणी मात्र एकच होती. उमजले की, हा फसवणूक करण्याचा नवीन प्रकार आहे. दर्शन झाल्यावर आम्ही गाडीत बसून सायंकाळी राहण्याची व्यवस्था पाहू लागले. तेव्हा तोच माणूस गाडीजवळ आला आणि म्हणू लागला, 'तुम्हास मराठी येते काय?' त्यावर मी चिडून म्हटले, 'दिवसातून किती वेळ विचारणार.' यावेळी तो आमच्या सोबत अरेरावी करू लागला. आता सांगा कुणास मदत करावी व कुणास नाही. इमोशनल फसवणुकीचा हा प्रकार आहे. घरी आल्यावर पूर्वीच्या जोडप्याने दिलेल्या नंबरवर अनेक वेळा फोन करून पाहिले, पण फोन नंबर अस्तित्वात नाही.

**सुहास लुतडे**/९९७५१०५३२६

### गुन्ह्यांचा तपास होईल का?

गेल्या काही वर्षांमध्ये मुंबईत झालेल्या गुन्ह्यांच्या तपासणीत अक्षम्य हेळसांड केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. ही हेळसांड हेतुपुरस्सर आणि जाणीवपूर्वक केली जात असल्याचाही संशय आहे. काही बाबतीत तर, गुन्हा होऊन कितीतरी वर्षे होऊनही अजूनही तपास सुरूच आहे. त्यातही पालघरमध्ये दोन साधूंच्या, पोलिसांच्या उपस्थितीत, झालेल्या निर्घृण हत्यांचा तपास कुठे, का आणि कोणामुळे रखडला आहे हे समजत नाही. त्याबरोबर मविआच्याच काळात दिशा सलियानची 'आत्महत्या' आणि सुशांतसिंग राजपूतच्या हत्येमुळे तत्कालीन सरकारवरील संशयात वाढ झाली होती. मविआ सरकारच्या काळात झालेल्या या हत्याप्रकरणात तत्कालीन सरकारने संशयास्पद रीतीने हे प्रकरण हाताळले होते. सुशांतसिंग प्रकरणी मुंबईत आलेल्या बिहार पोलिसांना 'क्वारंटाईन' करून तत्कालीन मविआ सरकारने पोलिस तपासात अडथळा निर्माण केला होता, हे सर्व लोक जाणून आहेत.

त्यानंतर महायुती सरकारच्या अडीच वर्षात या सगळ्या गुन्ह्यांचा तपास जलद होईल आणि संशयित आरोपींना कायद्यासमोर आणले जाईल, अशी अपेक्षा होती. मात्र महायुती सरकारने याबाबत दाखवलेली उदासीनता संतापजनक आहे. बऱ्याच प्रसारमाध्यमांनी वरील प्रकरणांमध्ये पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला होता, पण हळूहळू त्यांच्या पदरीही निराशा पडल्यामुळे तेही आता शांत झाले आहेत.

थोडक्यात काय तर वरील प्रकरणी सत्य परिस्थिती जनतेसमोर यावी अशी कोणाचीही इच्छा दिसत नाही किंवा या गुन्ह्यांमध्ये कोणाला तरी वाचवण्याचा प्रयत्न होतो आहे की काय, असाही संशय येऊ लागला आहे. पोलिस, संबंधित तपास यंत्रणा आणि महाराष्ट्र सरकार यांनी कोणालाही वाचवण्यासाठी प्रयत्न न करता या सर्व प्रकरणांचा तपास करून मृतात्म्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा आहे. अशा दिरंगाईमुळे समाजात गुंड-गुन्हेगारांचे मनोधैर्य कमालीचे वाढले आहे आणि त्यामुळे अपराधही वाढले आहेत हे विसरता कामा नये.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### प्रजासत्ताकदिनी करूया अभिनव संकल्प

आज प्रजासत्ताक दिनी मी गांभीर्यपूर्वक शपथ घेतो की, यापुढे आयुष्यात डिस्पोजेबल कपामध्ये चहा, दूध, कॉफी, पाणी पिणार नाही. कारण ते शरीरास घातक आहे. प्लॅस्टिक कोटेड डिशमध्ये प्रसाद घेणार नाही. प्लॅस्टिक पत्रावळीवर अन्न दूषित होत असल्यामुळे जेवण करणार नाही. कारण माझे माझ्या आरोग्यावर प्रेम आहे. स्वतःवर प्रेम आहे. माझ्या आईवर माझे जीवापाड प्रेम आहे तसेच यापेक्षा मोठी आई म्हणजे निसर्ग. या आईने मला शुद्ध हवा, पाणी, उत्कृष्ट जेवण अमर्याद असे सर्व काही भरघोस दिले आहे. तिच्या प्रती कृतज्ञता म्हणून हा मी हा साधा संकल्प आज करत आहे. स्वतःच्या आईप्रमाणेच वसुंधरेची काळजी करण्याचा हा संकल्प आहे. माझ्याकडून कुठलीही हानी होणार नाही याची मी काळजी घेणार आहे. आणि या माझ्या प्रामाणिक प्रयत्नात जास्तीत जास्त लोकांना सहभागी करत राहणार आहे. या प्रजासत्ताक दिनी हा साधा संकल्प सगळ्यांनी करावा.

**बाबा देशपांडे**/९४२३६१३२२६

### शंकरपट पुरातन सांस्कृतिक वारसा



शंकरपट हा वऱ्हाडातील एक सण समजला जातो. यासाठी वर्षभर बैलांची जोडी पोसली जाते. त्यांना बदाम-काजूचा खुराक देण्यात येतो आणि शंकरपटासाठी त्याची खास तयारी करून घेतली जाते. आमच्या नागपूरची शेतावरील बैलजोडी अमरावतीच्या मोठ्या अक्काच्या घरी सुयशदादाने नेली. तळेगांव दशासर येथील शंकरपटात त्या बैलजोडीला उतरविण्यात आले. ही बैलजोडी पटात मानकरी होती, याचा मनस्वी आनंद झाला. तळेगाव दशसहस्र येथे आमचे सासरे बापूसाहेब नानासाहेब देशमुख यांनी हा शंकरपट सुरू केला. संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी पट सुरू होतो. त्यात बेदाणी म्हणजे बैलाची जोडी पायटांगीला जोडतात आणि शर्यत असते. एक दिवस एकदाणी म्हणजे एका बैलाची शर्यत असते. अशा अनेक शर्यती शंकरपटात असतात. जिंकणाऱ्याला बक्षीस देऊन गौरविण्यात येते. शहाजी-शंतनू ही मुलं लहान असताना मुलांना घेऊन आम्ही नेहमी तळेगावला जात असू. तेथे यात्राही असते. शर्यतीसाठी मोठे शेत सारवून पटांगण तयार केले जाते. यात्रेत शेतीसाठी लागणारे सर्व साहित्य, तिळगुळाची चिकी, तिळगूळ, तिळाच्या रेवड्या, शेंगदाणा असे बरेच पदार्थ असतात. यात्रेत अनेक राहुट्या उभारलेल्या असतात. मुरमुऱ्याचा कच्चा चिवडा तर खूप चविष्ट असतो. मी येथून आवर्जून खरेदी करून आणलेली एक गोष्ट म्हणजे भिलावा (बिब्बा). वर्षभर साठवायचे तिखट, हळद, चिंच, धणे यांना कीड लागू नये म्हणून बिब्बे भरणीत टाकतात. गावचे पाटील, सरपंच, समितीच्या अध्यक्षांच्या हस्ते पटाचे रीतसर उद्घाटन होते. सुगीचं पीक निघाल्यानंतर शंकरपट म्हणजे शेतकऱ्यांचा विरंगुळा असतो. सगळे शेतकरी येथे येतात. त्यांना सात्त्विक आनंद येथे मिळतो. जास्त पैसे खर्च न करता निसर्गाच्या सान्निध्यात, शेतकऱ्याच्या मित्रांचा बैलांचा हा शंकरपट म्हणजे वऱ्हाडातील आनंद पर्वणी असते.

**डॉ. उज्ज्वला देशमुख**/९४२२८०७२४७

### राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी शाळांमध्ये जागृती करा!

राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राची अस्मिता. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी हे राष्ट्रध्वज अभिमानाने मिरवले जातात. काही राष्ट्रध्वज हे प्लॅस्टिकपासून तयार करण्यात येतात. नंतर ते फाटलेल्या अवस्थेत कचरापेटीत, रस्त्यावर, गटारात पडलेले आढळतात. काही लोक रंगसंगतीचे कपडे परिधान करतात, काही जण आपला चेहरा तिरंग्याच्या रंगाने रंगवतात, तर काही जण हातावर तिरंगा ध्वज काढतात. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी देशभक्तांनी इंग्रजांचे अत्याचार सहन केले, काठ्या खाल्ल्या, बंदुकीतून झाडलेल्या गोळ्या हसत हसत छातीवर झेलल्या, पण हातातील राष्ट्रध्वज जमिनीवर पडू दिला नाही. राष्ट्रध्वज जमिनीवर पडू देणे हा त्या क्रांतिकारकांचा अपमान आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भविष्य आहेत. भारताची ही भावी पिढी, राष्ट्राभिमानी व्हावी या दृष्टीने शाळांमध्ये राष्ट्रध्वजाचा मान राखावा यासाठी जनजागृती मोहीम- व्याख्यान, चित्रकला स्पर्धा, हस्तपत्रके वाटप, प्रश्नमंजूषाचे आयोजन केले जावे. त्यातून राष्ट्रध्वजाचा मान कसा राखावा हा संस्कार विद्यार्थ्यांवर होईल.

**डॉ. राहुल दवंडे**/नागपूर

### स्पर्धेतूनच मिळेल रास्त दराने वीज

राज्याच्या विजेच्या पुरवठ्यातील गळती रोखा असे नियामक आयोगाकडून सातत्याने सांगितले जात आहे. त्याशिवाय सामान्यांवरील विजेच्या दरवाढीचा बोजा कमी होणार नाही. मात्र याबाबतचे सर्व उपाय कागदावरच राहिले आहेत. याबाबत मे २०२२ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत आढावा घेतल्यास गळती पाच टक्क्यांवर आणण्याचे प्रमुख उद्दिष्ट होते. मे २०२२ मध्ये ४३ टक्के वीज गळती होती, ती वाढत जाऊन ऑक्टोबर २०२३ मध्ये ४८ टक्क्यांवर पोहोचली होती. विशेष म्हणजे शहरी भागात विजेची गळती कमी करण्यात प्रशासनाला थोडे फार यश आले आहे. त्या तुलनेत ग्रामीण भागात कृषिपंप व घरगुती विजेच्या समस्या गळतीच्या मुळाशी असून, त्याला लाभलेले राजकीय संरक्षण ही प्रशासनापुढे गंभीर समस्या आहे.

राज्यात अंदाजे चार हजार मेगावॅट एवढ्या मोठ्या प्रमाणात विजेची कमतरता भासत आहे. दुर्दैवाने गेल्या काही वर्षांत वीजनिर्मितीसाठी अपेक्षित प्रमाणात वाढती गुंतवणूक झालेली नाही. याबाबत राज्यांची गुंतवणूक करण्याची घटलेली क्षमता, हे महत्त्वाचे कारण आहे. अर्थात काही अपवाद सोडल्यास या मंडळाकडे विद्युत क्षेत्राची मक्तेदारी आहे. विद्युत क्षेत्राच्या खाजगीकरणानंतरही मक्तेदारी सर्वकष राहिली आहे. म्हणजे विजेचे उत्पादन, वितरण व तिच्या किमतीबाबतचे निर्णय घेणे, या सर्व बाबतीत ही मक्तेदारी आहे.

खरे म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रातल्या विजेचे वितरण व विक्री एकाच संस्थेच्या हाती असण्याची काहीच गरज नाही. आजही मुंबईतील विजेचे वितरण बेस्ट कंपनीच्या हाती आहे व उपनगरातील वितरण 'बीएसएस' कंपनीच्या हाती आहे. अशी व्यवस्था पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद व अन्य शहरांसाठी करणे अगदी सहज शक्य आहे. अशी स्वतंत्र वितरण कंपनी अस्तित्वात आली तर तिला वीज पुरवठ्यासाठी निर्मिती केंद्रे उभी करायला खाजगी उद्योजक आनंदाने पुढे येतील. सरकारला त्यात पडण्याची गरजच राहणार नाही. अधिकाधिक शहरी भागासाठी अशी व्यवस्था करणे शक्य आहे व विजेच्या वितरणात नक्कीच सुधारणा होईल. सध्या देखील कारखान्यांना स्वतःसाठी वीज उत्पादन करण्यास परवानगी देण्यात येते. साखर कारखाने उसाच्या सुकलेल्या चोथ्याचा इंधन म्हणून उपयोग करून विजेचे उत्पादन करतात. हे कारखाने त्यांना लागणारी जादा वीज विद्युत मंडळाला विकतात. या व्यवस्थेचा विकास करणे शक्य आहे. या नव्या व्यवस्थेत परदेशी कंपन्यांना वीज उत्पादन व वितरणाच्या क्षेत्रात प्रवेश करणे सोपे होईल. त्यात फार मोठी हमी देण्याची गरज उरणार नाही. विशिष्ट क्षेत्रासाठी उत्पादन व वितरण करण्याचे काम त्यांच्यावर सोपवले की भागेल. हे काम कमीत कमी खर्चात करण्यासाठी चढाओढ लावता येईल. या स्पर्धेत तुलनात्मक जो उत्तम सेवा स्वस्त दरात देईल अशा संस्थाच टिकतील. परिणामी, वीज ग्राहकांना वीज अत्यल्प किमतीत पडून विजेच्या क्षेत्रातील महावितरणची आजची मक्तेदारी नष्ट होईल.

**डॉ. चंद्रकांत कुलकर्णी**/९९६०९६७१३२

### देशासाठी धोक्याची घंटा

गेल्या वर्षात केवळ महाराष्ट्रातच नाही तर, संपूर्ण देशात बांगलादेशी रोहिंग्या नागरिकांचा सुळसुळाट वाढला आहे. मोठ्या प्रमाणात यांना सरसकट जन्माचे दाखले दिले जात असल्याचा गंभीर आरोप भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला आहे. आजपर्यंत राज्यात १ लाख ७ हजार लोकांना जन्म प्रमाणपत्र देण्यात आले असून जवळजवळ ९० हजार अर्जावर प्रक्रिया सुरू आहे असा खुलासा त्यांनी यावेळी केला. आता या १ लाख ७ हजार लोकांची सरकारद्वारे चौकशी होणार असल्याचे ते म्हणाले सदर बाब नोव्हेंबर महिन्यात ज्यावेळी मालेगावमध्ये गेले असताना पुढे आली. दोन लाख बांगला देशींना भारतीय बनवण्याचे कारस्थान झाले आहे. हा मोठा खुलासा झाल्यानंतर मालेगावचे तहसीलदार आणि नायब तहसीलदार यांना निलंबित करण्यात आले आहे.

आज देशातील सर्वसामान्य माणसाचा समज आहे किती ही अवघड काम असले तरी पैसे दिले की ते काम होते यातून असले प्रकार होतात. एकूणच भ्रष्टाचाराने संपूर्ण समाजच पोखरून टाकला आहे. सर्वच क्षेत्रांत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भ्रष्टाचार सुरू आहे. बरे असे नाही की याबाबत कायदा नाही देशात आज भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ हा भारताच्या संसदेचा कायदा आहे जो भारतातील सरकारी संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील व्यवसायांमधील भ्रष्टाचाराचा सामना करण्यासाठी लागू करण्यात आला आहे. पण त्याचा वापर प्रत्यक्ष किती होतो हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात उच्च पातळीवरील राजकीय नेते मोठ्या प्रमाणात प्रामाणिक राहिले; परंतु नंतर देशातील हे चित्र बदलायला सुरुवात झाली. नव्या बहुतांश राजकीय नेत्यांनी आपला प्रामाणिकपणा संपविला. देशप्रेम, लोकाभिमुख, निष्ठा हे शब्द गायब झाले असून पैसा हा शब्द एक महत्त्वाचा झाला. यामुळे सर्वसामान्यांमध्ये त्यांची प्रतिमाही मलिन बनू लागली. यामुळे आज जवळजवळ सर्वच क्षेत्रांतील सरकारी कर्मचारी सुद्धा छोट्या कामासाठी लाच घेऊ लागले. देशात, राज्यात जन्माचे दाखले असे कसे सरसकट वाटले जातात. देशहिताच्या दृष्टीने किती मोठी गंभीर बाब आहे. असे असताना आपल्याकडील प्रशासकीय यंत्रणा करतात तरी काय हा मोठा प्रश्न पडतो. दरवर्षी मारे यूपीएससी, एमपीएससी या केंद्रीय, राज्यस्तरीय प्रशासकीय परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या त्यांनी माध्यमांना दिलेल्या मुलाखती वाचल्यानंतर क्षणभर असे वाटते की यांच्या विचारातून यांच्या सेवा काळात देशात प्रचंड मोठे बदल, क्रांती घडणार आहे. काही वर्षांनंतर यापैकी एकाही अधिकाऱ्यांचे नाव एखाद्या देशहितासाठी किंवा उत्कृष्ट सामाजिक कामासाठी गणल्याचे आपल्या वाचण्यात ही येत नाही.

देशहितासाठी आवश्यक ज्या काही महत्त्वाच्या बाबी त्यामध्ये जसे जन्म दाखले येतात की ज्यावरून देशाची दिशा ठरते त्या ठिकाणी सुद्धा आपली प्रशासकीय यंत्रणा दुर्लक्ष करते ही देशहिताच्या दृष्टीने गंभीर व चिंतेची बाब आहे. केंद्र सरकारने या मुद्द्याकडे लक्ष देऊन यातील अधिकाऱ्यांना, कडक शिक्षा देणे गरजेचे आहे. एवढेच नव्हे तर केंद्र सरकारने सुद्धा आपल्या बांगलादेश सीमेवर गस्त वाढविणे तसेच संरक्षण कुंपण बांधणे आवश्यक आहे. अन्यथा उद्या आपणच हळूहळू आपल्या देशात अल्पसंख्य होऊ हा भविष्यातील धोक्याचा इशारा जन्म दाखले घोटाळा देत आहे.

**अविनाश देशपांडे**/पुणे

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ‘श्री सिद्धीविनायक’ मध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**
धाराशिव येथील श्री सिद्धीविनायक मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. च्या मुख्य कार्यालयात ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी ध्वजारोहण व भारतमाता प्रतिमेचे पूजन संस्थेचे संचालक ॲड. प्रतीक देवळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीत गायन झाले आणि देशभक्तीपर वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार जाधव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद गोरे, नितीन हुंबे, तसेच सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.



## प्रजासत्ताक दिन...



### परंडा : तहसिल कार्यालय

**परंडा, दि.२७ जानेवारी -**
परंडा शहर व तालुकाभरात भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम दि.२६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजून १५ मिनिटानी संपन्न झाला. परंडा तहसीलचे तहसीलदार निलेश मारुती काकडे यांच्या हस्ते सर्व प्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेची पुजा करून ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. तहसीलच्या प्रांगणात तहसिलदार निलेश काकडे यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकताच पोलीस पथक व होमगार्ड पथकाकडून ध्वजास सलामी देण्यात आली. यावेळी राष्ट्रध्वजारोहणाच्या कार्यक्रमास महसुल विभाग, संजय गांधी विभाग, पुरवठा विभागाचे सर्व नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, सर्व तलाठी तसेच राजकीय पुढारी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख दत्ता सांळुके, सुभाषसिंह सद्दीवाल, शंकर इतापे, संजय बनसोडे, रमेशसिंह परदेशी संजय कदम, मेजर सांगळे, तानाजी शिंदे यांच्यासह प्रतिष्ठीत नागरीक पत्रकार उपस्थित होते.



### तेर ग्रामपंचायत कार्यालय

**तेर, दि.२७ जानेवारी -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच दिदी काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब खोचरे, नवनाथ नाईकवाडी, ग्रा.प. सदस्य प्रतिक नाईकवाडी, नवनाथ पसारे, बापुराव नाईकवाडी, नामदेव कांबळे, रामा कोळी, लखन रसाळ, धनंजय आंधळे, अभिमन्यू रसाळ, भारत नाईकवाडी, मज्जीद मणियार, सतीश कदम, विजयसिंह फंड, बालाजी भक्ते, रणधीर सलगर, मंगेश पागरकर, बिभीषण लोमटे, इर्शाद मुलाणी, केशव वाघमारे, लोकेश काळे, दत्ता मगर, फातिमा मणियर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



### इटकळ ग्रामपंचायत कार्यालय

**इटकळ, दि.२७ जानेवारी -**
इटकळ येथे विविध ठिकाणी भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दूरक्षेत्र, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा मध्ये लोकसहभागातून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वाचनालयाची स्थापना करण्यात आली. वाचनालयास ५०० पुस्तके देण्यात आली. शाळेच्या मैदानात सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना, सुप्त गुणांना वाव देण्यात आले. प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध स्पर्धा घेऊन, विद्यार्थ्यांना, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष, पोलीस पाटील यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी ग्रामसेवक नितीन कांबळे, सरपंच साहेबा क्षिरसागर, उपसरपंच फिरोज मुजावर, पोलीस पाटील विनोद सलगरे व सर्व ग्रा.पं. सदस्य, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक व नागरिक हजर होते.

### तुळजापूर नगर परिषद कार्यालय

**तुळजापूर, दि.२७ जानेवारी -**
भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त नगरपरिषद कार्यालयांमध्ये नगरपरिषदचे कार्यालयीन अधीक्षक वैभव पाठक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सदरील कार्यक्रमास जेष्ठ नागरीक माधव कुतवळ,अशोक मगर, गोकुळ शिंदे, बाळासाहेब शिंदे, सचिन रोचकरी, पंडीतराव जगदाळे, विजय कंदले, किशोर साठे, अमर हंगरगेकर, नागनाथ भांजी, स्वातंत्र सैनिक, पत्रकार, शहरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहना नंतर स्वातंत्र सैनीक, जेष्ठ नागरीक, पत्रकार यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी माधव कुतवळ, अशोक मगर, गोकुळ शिंदे यांनी प्रजासत्ता दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

### येरमाळा जि.प. शाळा

**येरमाळा, दि.२७ जानेवारी -**
येरमाळा ता. कळंब येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये आज भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कळंब पं.स.चे माजी सभापती विकास बारकुल, उपसरपंच गणेश बारकुल, शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष लहु बारकुल, विलास बारकुल, येरमाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष सचीन बारकुल, दत्ता बारकुल उपस्थित होते. मुलींच्या टिपऱ्या आणि लेझीम हे या सांस्कृतिक कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांच्या कलेला दाद दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी केंद्रप्रमुख अनिल बारकुल, केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक पडवळ यांनी परिश्रम घेतले. तर विद्यार्थ्यांना जाधव, वाघमारे, देशमुख, चेचे, वणवे, बारकुल, डिडवळ, ठोंबरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यकम ाचे सुत्रसंचलन शेरखाने यांनी केले.

## जिल्ह्याचे मागासलेपणा दूर करण्यासाठी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीस कटिबध्द : पालकमंत्री सरनाईक

### ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन मुख्य समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**
जिल्ह्याचा मुख्य व्यवसाय हा शेती असल्यामुळे शेतीपुरक व्यवसायाला चालना देण्यात येईल. नागरिकांना शुध्द व स्वच्छ पाणी, मुलांना दर्जेदार शिक्षण, आरोग्याच्या चांगल्या सुविधा आणि बेरोजगारांच्या हातांना काम उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असून जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कटिबध्द असल्याची ग्वाही पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी दिली.

आज २६ जानेवारी रोजी ७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे मुख्य शासकीय ध्वजारोहण पोलीस मुख्यालयाच्या मैदान क्र.२ येथे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते उपस्थितांना संबोधित करतांना बोलत होते. या समारंभाला खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार सर्वश्री राणाजगजितसिंह पाटील, कैलास पाटील, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे, जल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष, पोलीस अधिक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधिक्षक गौहर हसन, प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव व जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री सरनाईक पुढे म्हणाले, राज्य सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा ३ टप्प्यामध्ये लाभ देण्यात आला आहे. या योजनेसाठी जिल्ह्यातील ४ लक्ष ३ हजार ६०० महिला पात्र ठरल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय येथे गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली १०० दिवसांचा सात कलमी कार्यक्रम जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ४८९५ प्रशिक्षणार्थी विविध शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये प्रशिक्षण घेत आहे. सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्ग जिल्ह्यातून जाणार असल्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. सोलापूर-तुळजापूर-धाराशिव नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाचे काम प्रगतीपथावर असल्याचे सांगून सरनाईक म्हणाले, या रेल्वे मार्गामुळे श्री क्षेत्र तुळजापूर रेल्वे मार्गाने जोडले जाणार आहे. त्यामुळे देश-विदेशातील भाविकांना तुळजापूर येथे येण्याचा मार्ग सुकर होणार आहे. श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदीर विकासाचा २१०० कोटी ७० लक्ष रूपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला असून मुख्यमंत्री यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाअंतर्गत २१ टिएमसी पाणी जिल्ह्याला सिंचनासाठी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. परंडा, भूम, वाशी, कळंब व धाराशिव तालुक्यातील ३५ गावातील १४ हजार ९३६ हेक्टर आणि तुळजापूर, उमरगा व लोहारा तालुक्यातील ५४ गावातील १० हजार ८६२ हेक्टर शेतीला सिंचनाचा लाभ होणार आहे. जिल्ह्यात पहिल्या टप्प्यामध्ये ५० नवीन बसेस लवकरच उपलब्ध करून देण्याचे नियोजन



आहे. राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रवाशांच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहणार असल्याचे सरनाईक म्हणाले. जिल्ह्यात सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीने बाधित शेतपिकांच्या नुकसानीसाठी १ लक्ष २५ हजार ४६० शेतकऱ्यांच्या बॅक खात्यावर १५९ कोटी २५ लक्ष रूपये जमा करण्यात आल्याचे सांगुन पालकमंत्री सरनाईक म्हणाले, उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट नुकसानीची रक्कम जमा करण्यात येत आहे. गाव तिथे स्मशानभूमी या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक गावामध्ये दहन किंवा दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ४४ हजार ७३९ शेतकऱ्यांना १३० कोटी ७७ लक्ष रूपयांचा लाभ देण्यात आल्याचे म्हणाले.

शेतकऱ्यांना समृध्द आणि सशक्त बनविण्यासाठी ग्रीस्टॅक योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे सांगून पालकमंत्री सरनाईक म्हणाले, या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सीएससी केंद्रातून मोफत ओळख क्रमांक तयार करून देण्यात येणार आहे. विविध कृषिविषयक योजनांचा लाभ घेण्यासाठी हा ओळख क्रमांक अत्यंत महत्वाचा आहे. तेव्हा जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी ओळख क्रमांक तयार करून घ्यावा, असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

ध्वजारोहणानंतर पालकमंत्री सरनाईक यांनी परेडचे निरीक्षण केले. परेडमध्ये पोलीस अंमलदार पुरूष व महिला, गृहरक्षक दल पुरुष-महिला, राष्ट्रीय छात्र सेना, छत्रपती हायस्कुल, श्रीपतराव भोसले हायस्कुल, अभिनव इंग्लीश स्कूल, धाराशिव, श्री.श्री.रविशंकर हायस्कुल, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सांजा, दिव्यांग कल्याण विभागाअंतर्गत जि.प. शाळेचे विद्यार्थी तसेच वज्र वाहन, क्युआरटी व्हॅन, दंगल नियंत्रण पथक, डॉग पथक, बीडीएस, आपत्ती व्यवस्थापन, अग्नीशमन दल आदीसह आरोग्य विभागाचे वाहन सहभागी होते. कार्यक्रमाला विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी, पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन व उपस्थितांचे आभार हनमंत पडवळ यांनी मानले.

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात जळकोटच्या सुपुत्राने केले ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२७ जानेवारी -**
तुळजापूर तालुक्याचे कार्याभिमुख आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी जळकोट येथील माजी ग्राम पंचायत सदस्य, युवा नेते अॅड. आशिष सोनटक्के यांना तुळजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापतीपद देऊन काम करण्याची संधी दिली. तुळजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात जळकोटच्या या सुपुत्राला पहिल्यांदाच भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्याचा मान मिळाला आहे.

तुळजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या ठिकाणी सभापती आशिष सोनटक्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी बाजार समितीचे उपसभापती सुहास गायकवाड, संचालक संतोष कदम, बालाजी रोचकरी, दत्ता वाघमारे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन सुनील जाधव, जय भवानी सहकारी सोसायटीचे चेअरमन अनिल हंगरगेकर, नागनाथ किलजे, राम जाधव, नानासाहेब कूराडे, धैर्यशील दरेकर, आनंद काळे, मुरली हंतागळे, राम चोपदार, बप्पा साखरे, व्यापारी विजय निंबाळकर, बाळासाहेब केसकर, अप्पा शेळके, बाजार समितीचे सचिव उमेश भोपळे, शिवानंद राठोड, नागेश देशमुख, प्रमोद पडवळ, सुनील लोमटे आदी मान्यवरासह शहरातील व्यापारी, बाजार समितीचे व्यापारी, बाजार समितीचे कर्मचारी, हमाल, नागरिक उपस्थित होते.

## माजी विद्यार्थ्याकडून शाळेस कपाट व शैक्षणिक साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ जानेवारी -**
येथील नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ येथील माजी विद्यार्थी राष्ट्रीय चित्रकार सिद्धार्थ शहाजी शिंगाडे यांनी त्याला मिळालेल्या प्रेरणा पुरस्कार रकमेतील २५ टक्के वाटा न.प.प्रा.शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी दिला.

यामध्ये एक लोखंडी कपाट सर्व विद्यार्थ्यांना कंपासचे वाटप सिद्धार्थचे वडील शहाजी शिंगाडे आई विजयमाला शिंगाडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. तसेच माजी विद्यार्थी कै. ॲड. किरण कुलकर्णी यांच्या यांच्या स्मरणार्थ चारुशीला किरण कुलकर्णी यांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गरजवंत व होतकरू विद्यार्थिनीला आर्थिक सहाय्य स्वरूपात १ हजार रुपये रोख स्वरूपात देण्यात आले.

## पाडोळी (आ.) येथे प्रजासत्ताक दिनानिमित अॅड. व्यंकटराव गुंड यांच्या प्रमुख उपस्थितीत वार्षिक स्नेहसंमेलन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**
जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय व रुपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडोळी (आ.) येथे संस्थेचे अध्यक्ष तथा रुपामाता समूहाचे प्रमुख अँड व्यंकटराव गुंड यांच्या प्रमुख उपस्थितीत ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. अँड. व्यंकटराव गुंड यांच्या हस्ते प्रतिमाचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली तद्पुर्वी ग्रामीण भागात उद्योग, कृषि, दुग्धव्यवसाय, बँकिंग, शैक्षणिक, विधी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल मुंबई येथे एबीपी माझा यांच्या तर्फे अनमोल रत्न तर नाशिक येथे रिसील डॉट इन व समाचार वाणी यांच्यातर्फे महाराष्ट्राचा अभिमान, उद्योगांचा सन्मान-महाराष्ट्र उद्योग रत्न पुरस्कार २०२५ मिळाल्याबद्दल जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय व रुपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडोळी (आ.) येथील दोन्ही मुख्याध्यापक यांनी शाळेच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुधाकर गुंड माजी जि.प. उपाध्यक्ष, गणेश पाटील सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन, बेंबळी, पठाण सर पोलीस सब इन्स्पेक्टर बेंबळी, डॉ. गौरी झोरे वैद्यकीय अधिकारी पाडोळी (आ), डॉ. सुसेन गाजरे मेडिकल कॉलेज लातूर, बाबुराव पुजारी, सतीश एकंडे, भाऊसाहेब गुंड, धनंजय पाटील, बांगर उपस्थितीत होते. या कार्यक्रमासाठी पाडोळी व पाडोळी परिसरातील शिक्षक उपस्थित होते. गणेश पाटील यांनी ग्रामीण भागामध्ये शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल, व शाळेतील विविध कार्यक्रम, उपक्रम, याबद्दल गुंड साहेब यांचे कौतुक केले या कार्यक्रमांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या कला सादर केल्या.


यावेळी रुपामाताचे प्राचार्य सुरेश मनसुळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय व रुपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र सुरवसे, शिक्षक अमोल गुंड, सचिन यादव उपस्थित होते.

## सारथीकडून मिळणाऱ्या योजनांची विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर सेंटरकडून माहिती

### एमकेसीएल, एसआयआयटी कॉँम्प्युटर सेंटरचा उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**
२६ जानेवारी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त धाराशिव जिल्ह्यातील आंबेवाडी, मेडसिंगा, चिखली, राजुरी, आरणी, महाळंगी, खानापुर, बोरगांव झाडी, गोवर्धनवाडी, उंबरे कोठा धाराशिव विविध ग्रामपंचायत येथे MKCL व SIIT कॉम्पुटर सेंटरच्या वतीने विद्यार्थ्यांमार्फत सारथीकडून मराठा समाजासाठी मिळणाऱ्या विविध मोफत योजनांची माहिती ग्रामस्थांना मार्गदर्शनपर करून देण्यात आली.





ग्रामसभेत एसआयआयटी कॉम्प्युटर इन्स्टिटयूटच्या माध्यमातून मराठा समाजासाठी मोफत असलेला ६ महिन्यांचा CSMS -DEEP कॉम्प्युटर कोर्स संदर्भात माहिती दिली.

सारथी संस्थेमार्फत एमपीएससी यूपीएससी करत असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण व कौशल्य विकास उपक्रम अशा विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच विविध कॉम्प्युटर कोर्स, वाढते सायबर गुन्हे याला बरेच लोक बळी पडतात. याला रोखण्यासाठी काय उपाययोजना करावी यासह विविध माहिती दिली जाते. याप्रसंगी गावातील संबंध नागरिक ग्रामस्थ सरपंच उपस्थित होते.

या उपक्रमासाठी SIIT COMPUTER सेंटरचे टीम आकाश मोरे, ऋतुराज घेवारे, अविनाश वाघमारे, शशिकांत वाघमारे यांच्याकडून आयोजन व MKCL जिल्हा समन्वयक धनंजय जेवळीकर यंच्याकडून मार्गदर्शन मिळाले.

## रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२७ जानेवारी -**
राज्यभर सरकारकडून रस्ता सुरक्षा अभियान राबिवण्यास येत आहे. याचा एक भाग म्हणून धाराशिव जिल्ह्यातील येडशी टोल नाका येथे दि.२६ जानेवारी रोजी रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव, सह्याद्री मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल व सह्याद्री ब्लड बँक धाराशिव यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिर घेण्यात आले. तसेच सायली नेत्रालय धाराशिव यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

त्यादरम्यान एकुण ५७ नागरिक, आयआरबी कर्मचारी व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी रक्तदान केले. सदर कार्यक्रमांमध्ये महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव येथील पोलीस अंमलदार, टोल प्लाजा येडशी येथील अधिकारी व कर्मचारी, महामार्गावर वाहतूक करणारे वाहनाचे वाहन चालक तसेच महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव परिसरातील नागरिक व मृत्युंजय दूत यांची आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी करण्यात आली. सदर वेळी लायसन्स व मोटारसायकल असणाऱ्या एकूण ११० गरजू व्यक्तींना मोफत हेल्मेट वितरित करण्यात आले.

## नळदुर्ग शहरात ठिकठिकाणी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**
नळदुर्ग येथे दि. २६ जानेवारी रोजी भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शासकीय, निमशासकीय तसेच जि.प. शाळा, खाजगी शाळा व महाविद्यालयात राष्ट्रीय ध्वज फडकावुन प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्लयावर सकाळी १०.१५ वा. पार पडला. याठिकाणी नळदुर्गचे अप्पर तहसिलदार अभिजित जगताप यांच्या हस्ते ध्वजरोहन करण्यात आला.

नळदुर्ग शहरात भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन दि. २६ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नगरपालिका, पोलिस ठाणे, महामार्ग पोलिस केंद्र, बसस्थानक, चावडी चौक, हुतात्मा स्मारक, क्रांती चौक, शास्त्री चौक, भवानी नगर, पोष्ट ऑफिस, जि.प. प्रशाला, जि.प. कन्या प्रशाला, केंद्रीय प्राथमिक शाळा, अंजली प्रशाला,उर्दु शाळा, डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश स्कुल, श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुल, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अध्यापक विद्यालय याठिकाणी प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरातील सर्व शाळांमध्ये विविध कार्यक्रम घेण्यात आले, यामध्ये क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध विषयांवर विद्यार्थ्यांची भाषणे, स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना पारीतोषिक वितरणआदी कार्यक्रम घेण्यात आले. ध्वजरोहणाचा मुख्य कार्यक्रम सकाळी १०.१५ वा. नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्लयावर पार पडला. याठिकाणी नळदुर्गचे अप्पर तहसिलदार अभिजित जगताप यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला. यावेळी नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे हेही उपस्थित होते. ध्वजरोहणानंतर याठिकाणी राष्ट्रगीत, राज्यगीत आणि संविधानाचे वाचन करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष शहेबाज काजी, मुश्ताक कुरेशी, माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण, बसवराज धरणे, विनायक अहंकारी,सय्यद तन्वीरअली खतीब,किशोर नळदुर्गकर, शहर शिवसेना प्रमुख संतोष पुदाले सरदारसिंग ठाकुर, मनसेचे जिल्हा सरचिटणीस ज्योतिबा येडगे, रिपाईचे दुर्वास बनसोडे, बाबासाहेब बनसोडे, अजय बागडे, देवानंद बनसोडे, परिवर्तन सामाजिक संस्थेचे मारुती बनसोडे, सुहास येडगे, विलास येडगे, दादासाहेब बनसोडे, पुरातत्त्व विभागाचे नळदुर्ग किल्लयाचे इन्चार्ज नागनाथ गवळी, तलाठी वायचळ यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पीसीएम जालनाच्यावतीने वृत्तपत्र व पत्रकारांच्या मागण्यांचे उपमुख्यमंत्री शिंदे व आ. लोणीकर यांना निवेदन

# आ.बबनराव लोणीकरांनी दिले प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

गेली पाच-सहा वर्षांपासून पत्रकार व वृत्तपत्रांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. हे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात यावे या आशयाचे निवेदन प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र (पीसीएम) जालना जिल्ह्याच्यावतीने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच आमदार बबनराव लोणीकर यांना शनिवार (दि २५) रोजी आ. लोणीकर यांच्या निवासस्थानी देण्यात आले आहे. प्रसंगी माजी मंत्री आ. अर्जुनराव खोतकर यांची उपस्थिती होती. यावेळी आ. लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आश्वासन दिले आहे. माजी मंत्री आ. अर्जुनराव खोतकर यांनीही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याबाबत सविस्तर माहिती देऊन पत्रकार आणि वृत्तपत्रांच्या हितासाठी योग्य ते निर्णय घेण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेऊ असे आश्वस्त केले. यावेळी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, सरचिटणीस दर्पण सकलेचा, सुहास वैद्य, नरेंद्र जोगड यांची उपस्थिती होती.

यात प्रामुख्याने गेल्या अडीच वर्षांपासून शासकीय संदेश प्रसार नियमावली-२०१८ नुसार शासनमान्य यादीत समावेश करण्यासाठी राज्यभरातील वृत्तपत्रांची पडताळणी झालेली नाही. त्या अनुषंगाने बैठक झालेली नाही.



राज्यभरातील अनेक वृत्तपत्रांचे अहवाल शासन दरबारी प्रलंबित आहेत. ग्रामीण भागातील पत्रकारांना मुख्यालयी त्यांच्या तालुका-जिल्ह्याच्या ठिकाणच्या वृत्तपत्र कार्यालयात येण्या-जाण्यासाठी बस पासची सुविधा उपलब्ध करून द्यावी अथवा या पत्रकारांना अधिस्विकृती पत्रिका मिळावी यासाठी पूर्णवेळ पत्रकारितेची असलेली अट शिथील करण्यात यावी. तसेच गेल्या सहा वर्षांमध्ये एकदाही दरवाढ झालेली नाही, शासकीय संदेश प्रसार नियमावली २०१८ नुसार दर दोन वर्षांनी महागाई निर्देशांकाशी सांगड घालून दरवाढ करणे अपेक्षित होते मात्र, दरवाढ झालेली नाही. नियमानुसार दरवाढ करण्यात यावी, अधिस्विकृती धारक पत्रकारांना काही बसेसमध्ये सवलत मिळत नाही. यासाठी महामंडळाच्या सर्व प्रकाराच्या प्रत्येक बसमध्ये (एसी, नॉन एसी, साधी, निमआराम, रातराणी, इलेक्ट्रीक, एशियाड अशा सर्वच प्रकारच्या ) अधिस्विकृती पत्रिकाधारकांना सवलत मिळावी. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय अंतर्गत सहाय्यक संचालक आणि उपसंचालक पदांसाठी (जाहीरात क्रं. १२९/२०२२, १३०/२०२२ व १३१/२०२२) एमपीएससी मार्फत भरती प्रक्रिया राबविण्यात येत होती. ही प्रक्रिया मागील दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. यात काही पत्रकारांनीही अर्ज केलेले आहेत. ही भरती प्रक्रिय राबविण्यात यावी, शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.२ मध्ये बदल करण्यात यावा. यात वृत्त-पत्रात निविदेसंदर्भात संक्षिप्त स्वरूपात जाहिरात प्रसिद्धीस देण्याची नोंद आहे. ती हटविण्यात येऊन संकेतस्थळावरील विस्तृत स्वरुपात प्रसिद्ध होणारी निविदा ही संपूर्णपणे वृत्तपत्रांना प्रसिद्धीस देण्यात यावी. आणि यातही लघु संवर्गातील साप्ताहिकांनाही अशी संपूर्ण निविदा प्रसिद्धीची जाहिरात देण्यात यावी. एका आर्थिक वर्षात किमान २० जाहिराती देण्यात याव्यात. वेब आणि समाजमाध्यमांना जाहिराती देण्यासंबंधी नियमावली निश्चित करण्यात यावी. शासनमान्य यादीत सामाविष्ट नसलेल्या वृत्तपत्रांना या नियमानुसार जाहिरात देण्यात यावी. ४०० चौसेमी ऐवजी १००० चौसेमी आकाराच्या जाहिराती देण्यात याव्यात, ज्येष्ठ पत्रकारांच्या पेन्शन संदर्भातील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात, ग्रामीण भागातील पत्रकारांना अधिस्विकृती पत्रिका मिळावी यासाठी साप्ताहिक व दैनिकांना देण्यात येणार्या अधिस्विकृती पत्रिकेत वाढ करण्यात यावी, यासह विविध मागण्यांचा समावेश आहे. निवेदनावर प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे राज्य सरचिटणीस महेश जोशी, जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांच्या स्वाक्षर्या आहेत.

---

## संक्षिप्त

### शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक पिडीत शेतकरी बसले आमरण उपोषणास

**राहुल लोणीकर यांनी भेट देऊन दिला पाठींबा**



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर येथील जयकिसान मशिनरीचे संचालक संदीप जगताप यांनी नेटा फेम कंपनीच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना लाखों रूपयांना फसविले असुन संदीप जगताप याच्या विरोधात पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे, परंतु अद्यापपर्यंत त्याच्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई न झाल्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी परतुर येथील उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे, या उपोषणास भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव राहुलभैय्या लोणीकर यांनी भेट देऊन फसवणुक प्रकरणी आरोपींवर तात्काळ कारवाई व्हावी यासाठी आपण शासनदरबारी पाठपुरावा करून शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देणार अशी ग्वाही त्यांनी उपोषणकर्त्यांना यावेळी दिली. यावेळी रमेश राव भापकर अंकुशराव नवल गजानन राजबिंडे सनी तनपुरे यांच्या शेतकरी उपस्थित होते.

### अंबड महसूल पथकाची धडाकेबाज कारवाई तीन ट्रॅक्टरसह ३ केन्या पकडल्या



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील मौजे पाथरवाला हद्दीतील गोदावरी नदी पात्राजवळील बाबाची थडी या ठिकाणी तहसील कार्यालय अंबडच्या महसूल पथकाने अचानकपणे येऊन गोदावरी नदीपात्रातून रेतीचे अवैध उत्खनन करणारे तीन ट्रॅक्टर केनी सह पकडले. महसूल पथक अचानक पणे उत्खननस्थळी पोहोचले असता तीन ट्रॅक्टर केनीच्या साह्याने रेतीचे उत्खनन करत असल्याचे दिसून आले. सदर कारवाई दरम्यान पथकाने अंदाजे सहा लाख रुपये किमतीचा मुद्देमाल (वाहने) जप्त करण्यात आली. सदर कारवाईमुळे वाळू माफियांचे धाबे दणाणले असून महसूलच्या पथकाकडून वारंवार होत असलेल्या कारवायामुळे वाळू माफियांचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच या कारवायामुळे रेतीच्या अवैध उत्खनन व वाहतुकीवर सुद्धा सकारात्मक परिणाम झाला आहे. सदर कार्यवाही महसूलच्या पथकाने सहाय्यक जिल्हा अधिकारी मा श्री पुलकित सिंह व तहसीलदार मा श्री विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार श्री विवेक उडान नायब तहसीलदार श्री महेंद्र गिरगे मंडळ अधिकारी श्री के एस एडके मंडळ अधिकारी श्री संदीप नरुटे मंडळ अधिकारी श्री एस बी कारमपुरी ग्राम महसूल अधिकारी स्वप्नील खरात रमेश कांबळे विनोद ठाकरे पवन तुपकर विकास डोळसे महसूल सेवक अशोक शिंदे मनोज उघडे मनीष जिरेकर श्याम विभुते यांच्या पथकाने केली.

### पालकमंत्री पंकजा मुंडे यांची ड्रायपोर्टला भेट

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी आज जालना येथील दरेगाव येथील ड्रायपोर्टला भेट देवून पाहणी केली .

यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, येथील ड्रायपोर्ट प्रकल्प सुरु झाल्यास उद्योगांना खुप मोठी मदत होवून चांगली सुविधा निर्माण होणार आहे. तसेच येथील उत्पादन बाहेर नेण्यास मदत होणार आहे. त्यामुळे ड्रायपोर्टच्या विकासाच्या कामांना अधिक गती देवून, ड्रायपोर्ट लवकरात-लवकर सुरु करण्याच्या सुचना त्यांनी दिल्या.

यावेळी आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, अधिक्षक अजयकुमार बंसल, अप्पर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, प्रकल्प व्यवस्थापक विकास मलीक, कॉनकोरचे सहायक अधिकारी शिरीष तळेले, जालना उपविभागीय अधिकारी श्रीमंत हारकर आदींची उपस्थिती होती.

---

## अरविंद देशमुख गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देण्यासह राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविणारे तायक्वांदो या ऑलिम्पिक मान्य युद्धकलेचे राष्ट्रीय खेळाडू तसेच पंच अरविंद देशमुख यांना गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रजासत्ताक दिनानिमित्त झालेल्या प्रमुख समारंभात पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जिल्हा क्रीडा कार्यालयाच्यावतीने पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित या कार्यक्रमात खा. डॉ. कल्याण काळे, आ. अर्जुनराव खोतकर, आ. नारायण कुचे, माजी आमदार अरविंद चव्हाण, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, पोलीस अधीक्षक अजय बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, तसेच क्रीडा अधिकारी डॉ. रेखा परदेशी आदी मान्यवर उपस्थित होते. सन्मानपत्र आणि रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप



आहे.

क्रीडा क्षेत्रातील उज्वल प्रवास गेल्या १५ वर्षांपासून क्रीडा क्षेत्रात असलेल्या अरविंद देशमुख यांनी उत्कृष्ट तायक्वांदो खेळाडूपासून राष्ट्रीय पंच होईपर्यंतचा प्रवास केला आहे. कराटे या प्रकाराचे कोरियन तायक्वांदोमध्ये रूपांतर झाल्यानंतर त्यांनी या ऑलिम्पिक मान्य खेळात स्वतःला सिद्ध केले. अनेक खेळाडूंना त्यांनी प्रशिक्षण व मार्गदर्शन देत राज्य व राष्ट्रीय पातळीवर पोहोचवून जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे नुकतेच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय रेफ्री सेमिनारमध्ये जालना जिल्ह्याला आय. आर. ही पदवी मिळवून देण्यामध्ये अरविंद देशमुख यांचा सिंहाचा वाटा आहे अरविंद देशमुख जालना जिल्हा तायक्वांदो असोसिएशनचे अध्यक्ष असून, स्पोर्ट्स अँड कल्चरल असोसिएशनचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. क्रीडा क्षेत्राशिवाय ते सामाजिक कार्यातही योगदान देत आहेत. अखिल भारतीय मराठा महासंघाचे जालना जिल्हा अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि नागरी समस्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. या सन्मानामुळे जालना जिल्ह्याचा क्रीडा क्षेत्रातील लौकिक उंचावला असून, सर्व खेळाडू व प्रशिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. हा पुरस्कार आपले क्रीडा गुरु शिवाजीराव चव्हाण यांना समर्पित करून त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. अरविंद देशमुख यांचा गौरव म्हणजे संपूर्ण जालना जिल्ह्यातील खेळाडूंसाठी प्रेरणा आहे. त्यांच्या अथक परिश्रमाने जिल्ह्यातील क्रीडा चळवळीला बळकटी मिळाली असून, खेळाडूंसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ ठरले आहेत. पुरस्कारामुळे जालना जिल्ह्याचा क्रीडा क्षेत्रातील लौकिक वाढला असून, सर्वस्तरांतून अरविंद देशमुख यांचे अभिनंदन होत आहे.

## शिवसेनेत प्रवेश केलेलाचा मोहन अग्रवाल यांच्या वतीने सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते जालना येथे झालेल्या आभार दौऱ्यामध्ये शिवसेना पक्षात प्रवेश केलेल्या उबाठा गटाच्या शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांचे जिल्हा कार्यालय परतूर येथे शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये ऊबाठा गटाचे उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब तेलगड , तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, उपतालुकाप्रमुख प्रदीप ठोके, युवा सेना तालुकाप्रमुख सचिन डवले, सातोना विभाग प्रमुख किरण कातारे , आष्टी उपविभाग प्रमुख सुभाष गोरे, उपतालुकाप्रमुख संजय ठोंबरे, कामगार सेना तालुका अध्यक्ष आनंद वाकळे, आष्टी उपविभाग प्रमुख संतोष सागडे ,ज्ञानेश्वर शेळके, सुभाषराव धुमाळ व अशा अनेक शिवसैनिकांचा शिवसेना जिल्हा प्रमुख मोहन अग्रवाल यांच्या संपर्क कार्यालया मध्ये सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल, उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले, तालुकाप्रमुख अमोल सुरंग, वि जे एन एन टी जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव तरवटे, शहर प्रमुख दीपक हिवाळे, विधानसभा संघटक विजयकुमार गिरी, अल्पसंख्याक विभाग तालुकाध्यक्ष शेख खाजा शेख चांद, युवा सेना तालुकाप्रमुख अविनाश कापसे, श्रीष्टी विभाग प्रमुख अतुल आर्दड, सेवली विभाग प्रमुख प्रल्हादराव शेळके, व आदी शिवसैनिकांची यावेळी उपस्थिती होती.

---

## माझा विजय हा विजय शेतकरी, सर्वसामान्य, कामगार कष्टकऱ्यांचा -आ.संतोष दानवे

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

शेतकरी कामगार कष्टकरी महायुती व भाजपा कार्यकर्ते , कर्मचारी,लाडक्या बहीणीसह सर्वसामान्यांनी विधानसभेची निवडणूक हातात घेऊन जीवाचे रान केले त्यामुळे आमदारकीत विजयाची हॅट्रिक साधण्यात यश आले असून हा विजय शेतकरी सर्वसामान्यांचा असल्याचे प्रतिपादन आ. संतोष दानवे यांनी २७ जानेवारी सोमवार रोजी पंचायत समितीच्या मैदानावर पंचायत समिती व त्यांच्या अतर्गंत येणाऱ्या विभागाने भव्य सत्काराला उत्तर देताना केले .

यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष नाना भागिले, चेअरमन विजयसिंह परिहार, गटविकास अधिकारी एन .टी . खिल्लारे, गट शिक्षणाधिकारी सतिष शिंदे, ता . आरोग्य अधिकारी प्रतिभा मुळीक,गोविंदराव पंडित, शालीकराम म्हस्के, संतोष लोखंडे, दगडूबा गोरे, मधुकर गाढे, राजेश चव्हाण, सुधीर पाटील, अनिल बोर्डे,रविराज जैस्वाल, विजय परिहार, ग्रामसेवक संघटनेचे ता अध्यक्ष सुनिल लोखंडे, सरपंच संघटनचे ता अध्यक्ष राजीव गायकवाड, अमोल पडघन, सरपंच दासु उबाळे, कैलास वायाळ, दिनकर मरकड ,मधुकर देठे, विनोद राऊत, यांची प्रमुख उपस्थिती होती . पुढे बोलताना आ. दानवे म्हणाले की गेल्या दहा वर्षात आपण तालुक्यामध्ये विविध लोक कल्याणकारी योजना आणल्या असून तालुका वीज रस्ते पाणी विविध योजनांची घरकुले, जलजीवन, यावर मोठा निधी खर्च केला आहे तर कर्मचाऱ्यांनाही सन्मानाची वागणूक दिली त्यामुळे येणाऱ्या काळात प्रशासन गतिमान करायचे असून



अधिकारी कर्मचारी यांच्या समन्वयातून मतदारसंघात विविध योजना प्रभावीपणे राबविणार असल्याने कर्मचाऱ्यांनीही नागरिक आपल्याकडे काही काम घेऊन आल्यास त्यांचे तत्परतेने काम करावे तसेच कार्यालयीन कामकाजावेळी कर्मचाऱ्यांनी कार्यालयात हजर असायला हवे कर्मचाऱ्यांनी जनतेच्या कामात कुचाई अथवा विलंब केल्यास अशा कर्मचाऱ्यांची हाईगई केली जाणार नाही अधिकारी कर्मचाऱ्यांची जनतेला न्याय देण्याची भूमिका असावी तसेच येणाऱ्या काळात मी स्वतः जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी व त्यावर तोडगा काढण्यासाठी हप्त्यातील एक दिवस जाफराबाद येथील प्रत्येक कार्यालयात येणार असल्याचे ते म्हणाले .

मात्र आपण कधीच सत्तेची हवा डोक्यात जाऊन दिली नाही म्हणून सर्वसाधारण कार्यकर्ता या विजयाचा शिल्पकार असून तुमच्या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही व यापुढे काळात मतदारसंघात विकास कामासाठी कटिबद्ध असून आता मी मतदार संघातील सव्वातीन लाख जनतेचा सेवक आहे म्हणून सर्वांगीण विकासासाठी मी सदैव तत्पर राहील असे आश्वासनही त्यांनी दिले .

तर गट विकास अधिकारी एन . टी .खिल्लारे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले की माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे व आ.संतोष दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकास करण्यात येत असून घरकुले विहिरींची कामे अंगणवाड्याच्या यासह तालुक्यात रस्ते, वीज, पाणी ,विविध शासकीय योजना लाडक्या बहिणींचे प्रस्ताव घरकुले मोठ्या प्रमाणात मंजुर करण्यात आलेल्या असून शासन आणि प्रशासन यांच्या समन्वयातून विकासाला गती आलेली आहे तर येणाऱ्या काळातही माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे व आ .संतोष दानवे हे केंद्र आणि राज्य सरकारकडून मोठा निधी आणणार असून तालुक्यातील ग्रामस्थांनी आपआपल्या गावाचा विकास साधावा असे सांगितले यावेळी शालीकराम म्हस्के संतोष लोखंडे यांच्यासह आदींची भाषणे झाली. यावेळी आमदार संतोष दानवे यांचा ग्रामसेवक संघटना गटशिक्षणाधिकारी कार्यालय तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय पशु धन कार्यालय ,विविध बचत गट व विविध पक्ष संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते लाडक्या बहिणी यांच्यासह आदींनी सत्कार केला सूत्रसंचालन केंद्र प्रमुख गजानन मांटे तर आभार गणेश लोखंडे यांनी यांनी मानले. यावेळी ग्रामसेवक सरपंच तथा पंचायत समितीच्या विविध विभागातील अधिकारी तथा कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

## नळविरा येथील जिल्हा परिषद शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नळविहीरा येथे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते सदरील कार्यक्रमांचे उदघाटन कुंभारझरी जिल्हा परिषद गटाचे जिल्हा परिषद सदस्य



शालिकराम पाटील म्हस्के यांच्या शुभहस्ते झाले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजेश पाटील चव्हाण, मधुकर पाटील गाढे, विजयसिंह परीहार,सतिश शिंदे गटशिक्षणाधिकारी प.स.जाफराबाद, कुंभारझरी केंद्राचे केद्रं प्रमुख सुधाकर चिंधोटे,साधनव्यक्ती नारायण पिंपळे, रमेश साळवे मु.अ.सांवगी प्रीती जंजाल सरपंच , पत्रकार अध्यक्ष मुकेश भारद्वाज. पत्रकार सचिव विशाल वाकडे विनोद फदाट.आदीची उपस्थिती होती या स्नेहसंमेलनात शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध गीते, समाज प्रबोधन पर नाटिका सादर केली यासाठी उपस्थित प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली व बक्षीसांचा वर्षाव केला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय समितीचे अध्यक्ष शंकर पाटील गाडेकर उपाध्यक्ष अंकुश गाडेकर, आकाश वाकुडे, विष्णु .जंजाळ प्रल्हाद गाडेकर.सर्व सन्मानिय सदस्य ,मु.अ.शिवहारी नागरे,डी.आर.मुनेमाणिक, भाऊसाहेब जाधव,सुनिता खलसे,मंजुषा बकतकार, पुजा गहीरवाल,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावता तिडके यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रमोद कळंबे यांनी केले

## राष्ट्रीय बंजरा विकास मिशन भारत संघटनेच्या राज्य मीडिया प्रमुखपदी अरूण राठोड

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील तळणी येथील अरूण राठोड यांची राष्ट्रीय बंजरा विकास मिशन भारत संघटनेच्या राज्य मीडिया प्रमुखपदी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष देवराव राठोड यांनी निवड केली. आयोजित कार्यक्रमात नियुक्ती पत्र देऊन सन्मानित केले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष बळीराम राठोड, महाराष्ट्र प्रदेशध्यक्ष दतू जाधव, महिला प्रदशाध्यक्ष सो. सविता चव्हाण,कार्यकारी अध्यक्ष अमोल चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष गुलबदास चव्हाण, मराठवाडा महासचिव वैजिनाथ जाधव यांचीही उपस्थिती होती. अरूण राठोड यांच्या निवडीमुळे बंजारा समाज देशात २६ उप नावाने विभागलेला असून देशात बजारा समाजाला अलग अलग नावाने अलग अलग कॅटेगरीत असल्याने बंजारा समाजाचा विकास झालेला नाही.म्हणून



राष्ट्रीय बंजारा विकास मिशन २०१४ पासून श्री देवराव राठोड बंजारा यांचे नेतृत्वात भारत सरकारशी संघर्ष करीत आहेत. महाराष्ट्र राज्यात आदिवासी आरक्षण श्रेणीत समावेशासाठी महाराष्ट्र राज्यात संघटना मजबूत करण्यासाठी आपल्याला राज्य मिडीया प्रमुख या पदावर नियुक्त केले जात आहे.

आपण आपल्याला जिल्ह्यात, राज्यात तांडा-तांड्यात संघटना मजबुत करावी, संघटनेने दिलेल्या जबाबदारीस आपण विश्वासास पात्र आहातच यात काही शंका नाही, आपणास दिलेल्या जबाबदारीस आपण खंबीर पणे लढा देऊन आपण समाजाला न्याय हक्का मोठा लढा द्यालच असेही नियुक्ती पत्रात नमूद केले आहे. या निवडीबद्दल पत्रकार अरूण राठोड यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

---

## विकासाच्या बाबतीत सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करु-ना.पंकजा मुंढे

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंढे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्यालयात सदिच्छा भेट दिली. विकासाच्या बाबतीत सर्वच पक्षाला न्याय देण्याचा आपला प्रयत्न राहिल असे प्रतिपादन यावेळी ना. मुंढे यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ. अरविंदराव चव्हाण यांनी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पालकमंत्री पंकजा मुंढे यांचे स्वागत केले. या कार्यक्रमास आ. नारायण कुचे, आ. संतोष दानवे, भाजपचे जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, बळीराम कडपे,शकुंतला



कदम, पुष्पाताई चव्हाण, ज्ञानेश्वर सरकटे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना ना. पंकजा मुंढे म्हणाल्या की, तीन बलाढ्य पक्ष महायुतीमध्ये सोबत आहे त्यामुळे विकास करण्यास कोणी रोखू शकत नाही, सर्वांना न्याय मिळेल, संविधानिक कामे सोबत घेऊन करणार आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण म्हणाले की, जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना महायुती म्हणून विकास कामात सहभागी करून घ्यावे अशी कार्यकर्त्यांची भावना आहे. आपण ही कार्यकर्त्यांच्या भावना समजून विकासाच्या कामात बरोबरीने न्याय दयाल असा आम्हाला विश्वास आहे असे ते म्हणाले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके, नरेंद्र चव्हाण, धैर्यशील चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष आण्णासाहेब चित्तेकर , मिर्झा अनवर बेग, कैलास केंधळे, शिवचरण बाळराज,सतिश वाहुळे, अमोल खरात, अँड दावणगांवकर, मणकर्णा डांगे, संगिता नागरगोजे, तालुकाध्यक्ष कैलास मदन, विठ्ठल बरकुले, सतीश ढवळे, सुरेश सपाटे , रमेश मुळे,सेवादलाचे पद्माकर हांडे, नवनाथ लोखंडे, सतीश फतपुरे, विजय सोनवणे, युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे, कांचन शिरभे, गीतांजली ढवळे , संगीता झाडीवाले, अर्चना गायकवाड,बालिका कान्हेरे,रायुकाचे वैभव नालेगांवकर, दिनेश दांडेकर, तालुकाध्यक्ष उमेश मोहिते,संतोष पुंगळे,संदीप राठोड, विकास चव्हाण, दिनकर दराडे,आकाश श्रीरामवार,शंकर मुळे, बाबासाहेब भुजंग, राहुल लष्कर,परमेश्वर कापसे, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...

### पूर्णा शहरात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**पूर्णा,/प्रतिनिधी :** शहरात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला यानिमित्त शहरातील विविध कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम तहसील कार्यालयाच्या प्रांगणात रविवारी सकाळी सव्वा नऊ वाजता संपन्न झाला या ठिकाणी तहसीलदार माधवराव बोथीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी नायब तहसीलदार प्रशांत थारकर, कृष्णा मस्के पंढरीनाथ शिंदे सतीश नाईक आदी मान्यवर उपस्थित होते तसेच पूर्णा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात पूर्णा न्यायालयाचे न्यायाधीश गजानन जानकर यांच्या हस्ते सकाळी सात वाजून पन्नास मिनिटांना ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सहदिवाणी न्यायाधीश श्रीमती मेघा पौळ यांचे सह कर्मचारी वकील संघाचे सदस्य उपस्थित होते तसेच येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागी कार्यालयात अभियंता सुधाकर राठौड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर पूर्णा पंचायत समितीच्या कार्यालयात गटविकास अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

### पिक विमा रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करा - वालूर मंडळातील शेतकऱ्यांची तहसीलदारांना निवेदनाद्वारे मागणी

**सेलू,/प्रतिनिधी :** पिक विमा रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करा तालुक्यात सप्टेंबर २०२४ मध्ये खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीत पिकांचे प्रचंड नुकसान झाले. याबाबत पंचनामे होऊनही अद्याप पिक विमा शेतकऱ्यांना मिळालेला नाही. पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करावी, अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे

या संदर्भात तहसीलदार डॉ. शिवाजी मगर यांना २३ जानेवारी रोजी निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, खरीप हंगामात सेलू तालुक्यातील वालूर महसूल मंडळात सप्टेंबर २०२४ मध्ये एकाच दिवशी २५० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. या अतिवृष्टीमध्ये पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. या नुकसानीची भरपाई विमा कंपनीकडून अद्याप मिळालेली नाही. पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर तत्काळ जमा करावी, अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर रामेश्वर गाडेकर, संपत राठोड, दादासाहेब गाडेकर, प्रशांत नाईक, अशोक गाडेकर, दिलीप टाके, विकास जाधव आदींच्या सह्या आहेत.



### पारवा दरोडा : एक आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी तालुक्यातील मौजे पारवा शिवारातील शेत आखाड्यावरील दरोडा व सामूहीक अत्याचार प्रकरणात स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने एका दरोडेखोरास वाळूज (जि.छत्रपती संभाजीनगर) परिसरातून अटक केली.

पारवा शिवारात शेत आखाड्यावर दरोडा टाकून शेत मजूरांच्या कुटूंबियास बेदम मारहाण करण्यात आली होती. तसेच एका महिलेवर सामूहीक अत्याचार करुन सोने-चांदीचे २ लाख ६ हजार रुपयांचे दागिणेही लंपास केले होते.

# परभणी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबध्द- पालकमंत्री साकोरे



**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-:** परभणी जिल्ह्यातील जनतेचे प्रश्न सोडवणे, त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवणे यासह नागरिक, शेतकरी, महिला, तरुण, आणि विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्याबरोबरच परभणी जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द असल्याचे प्रतिपादन राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते आज परभणी येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडीयम येथे पार पडले. यावेळी शुभेच्छापर संदेश देताना त्या बोलत होत्या. यावेळी खासदार संजय जाधव, आमदार राहूल पाटील, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर, मनपा आयुक्त धैर्यशील जाधव, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक, पदाधिकारी, पत्रकार, नागरिक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

पालकमंत्री म्हणाल्या की, १५ ऑगस्ट, १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र झाला. या स्वतंत्र देशाची राज्यघटना तयार करण्याचे महान कार्य घटनाकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. २६ जानेवारी, १९५० रोजी भारत देश प्रजासत्ताक झाला आणि अंतिम सत्ता प्रजेच्या हाती सोपविण्यात आली. आपला भारत हा एक मोठा लोकशाही देश आहे. ज्या देशाची सर्व सत्ता प्रजेच्या हाती असते, तो देश म्हणजे प्रजासत्ताक होय.

आपला परभणी जिल्हा विकासाभिमुख जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्याच्या सर्वांगिण प्रगतीसाठी मी कटीबध्द आहे, असे सांगून पालकमंत्री म्हणाल्या की, सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला आहे. मला खात्री आहे की, आपल्या जिल्ह्यात हा कृती कार्यक्रम यशस्वीपणे राबविला जाईल. शेतकऱ्यांसाठी शासनाच्या अनेक योजना आहेत. त्याचा शेतकऱ्यांनी अवश्य लाभ घ्यावा. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देण्याकरीता विविध यांत्रिकी कृषी औजारांसाठी केंद्र व राज्यशासन पुरस्कृत योजने अंतर्गत अनुदान दिले जाते. या योजनेव्दारे मागील तीन वर्षांत ७ हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना रुपये ४५ कोटी इतके अनुदान महाडीबीटी पोर्टल प्रणालीव्दारे अदा करण्यात आले आहे. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतंर्गत सन २०२३-२४ या वर्षात २८२ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड झालेली असून १२७ लाभार्थ्यांना रुपये एक कोटी ९० लाख अनुदान अदा करण्यात आले आहे. मनरेगा अंतर्गत शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात परभणी जिल्हा अग्रेसर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजने अंतर्गत चालू वर्षात नवीन विहिरीसाठी २३१ लाभार्थी व इतर बाबींकरीता ५४६ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. तर बिरसा मुंडा कृषी क्रांती योजने अंतर्गत नवीन विहिरीसाठी १८ आणि इतर बाबींकरीता ६७ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

पालकमंत्री पुढे म्हणाल्या की, ऊर्जेची गरज भागविण्यासाठी सध्या पर्यावरणपूरक सौरउर्जे ला महत्त्व देण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेली प्रधानमंत्री सौर कृषी पंप व कुसुम घटक योजनेतंर्गत परभणी जिल्हयातील ९ हजार ८८२ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. अन्य शेतकऱ्यांनीही या योजनेचा लाभ घेऊन आपले कृषी उत्पन्न वाढवावे. परभणी जिल्हयात रुग्णांना चांगल्या अत्याधुनिक आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी मी निश्चितपणे प्रयत्न करेल. जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढीने रक्त संकलनात राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. जिल्हा रुग्णालयात नवीन कॅथलॅबचे काम प्रगतीपथावर असून भविष्यात रुग्णांना ॲन्जिओग्राफी, ॲन्जिओप्लास्टी इत्यादी सुविधा मोफत मिळणार आहे. सेलू येथे ५० बेडचे नवीन स्त्री रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम सध्या सुरु आहे. लवकरच हे रुग्णालय कार्यान्वित होईल. जिल्ह्यात सुमारे ५ लाख ४७ हजार लाभार्थ्यांना ई-हेल्थ कार्डचे वाटप करण्यात आले आहे.

महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा मानला जातो. मागील वर्षात या विभागाने वसुलीचे शंभर टक्के उदिष्ट पूर्ण केले आहे. शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची असणारी ॲग्रिस्टॅक योजनेची सध्या अंमलबजावणी सुरु आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळणार आहे. यासाठी ६३५ पथकांची गावनिहाय नियुक्ती करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी अवश्य घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

पालकमंत्री म्हणाल्या की, विविध योजनांच्या माध्यमातून जिल्हयाचा औद्योगिक विकास साधण्यासाठीसुध्दा प्रयत्न केले जात आहेत. शासनाच्या औद्योगिक समूह विकास योजनेतंर्गत सेलू येथे केशवराज कॉटन क्लस्टर सुरु झाले आहे. १८५ लघुउद्योजकांनी शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेचा लाभ घेऊन उद्योग सुरु केला आहे. महिला व बालकांच्या कल्याणासाठी विविध योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहेत. मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेमुळे सर्वसामान्य महिलांना दिलासा मिळाला आहे. समाजातील मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात. भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत चालू आर्थिक वर्षात अनुसूचित जातीच्या एकूण ३ हजार १०० विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळा अंतर्गत ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी गंगाखेड, पालम, सोनपेठ येथे ६ वसतीगृह सुरु करण्यात आले आहेत. रमाई आवास योजने अंतर्गत २४ हजार ९७९ लाभार्थ्यांना हक्काचा निवारा उपलब्ध करुन देण्यात आला आहे. क्रीडा विभागाच्यावतीने जिल्हा क्रीडा संकुल, परभणी येथे क्रीडा सुविधा निर्मितीसाठी नव्याने रुपये १२३ कोटींची प्रशासकीय मान्यता शासनाकडून मिळालेली आहे. लवकरच सुविधा निर्मितीचे कामे पूर्ण करण्यात येईल. पुर्णा, जिंतूर, सेलू व गंगाखेड येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्याचे कामही प्रगतीपथावर आहे.

''मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत'' शासकीय व खाजगी आस्थापनांवर सुमारे १ हजार ७४४ रूजू झाले आहेत. ''अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळा''मार्फत राबविण्यात येत असलेल्या कर्ज व्याज परतावा योजने अंतर्गत परभणी जिल्ह्यात आतापर्यंत सुमारे एक हजार ५९४ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर रुपये १२ कोटी इतका व्याज परतावा जमा करण्यात आला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना सन २०२३-२४ अंतर्गत भटक्या जमाती प्रवर्गातील ४ हजार ४०३ लाभार्थींना घरकुल बांधण्यासाठी शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे. तर मोदी आवास घरकुल योजने अंतर्गत इतर व विशेष मागास प्रवर्गातील १३ हजार ५९६ लाभार्थींना मान्यता देण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्था आबाधित ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणा सदैव सक्रीय असते. आपल्या जिल्हयात शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याकरीता जनतेनेही पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन पालकमंत्री यांनी केले.

प्रारंभी पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी पोलिस, गृहरक्षक दल तसेच अन्य जवानांच्या पथ संचलनाचे निरिक्षण करुन संचलनाची मानवंदना स्वीकारली. यामध्ये पोलीस विभागाचे गृहरक्षक दल, नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिक शाळा, पृथ्वीराज देशमुख सैनिक शाळा धर्मापूरी, जवाहर नवोदय विद्यालय, गांधी विद्यालय, जलद प्रतिसाद पथक, बॉम्ब शोधक वाहन, श्वान पथक, दंगा नियत्रंण पथक, अग्निशमन दल, जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांचे पथक संचलनात सहभागी झाले होते.

यावेळी पालकमंत्री यांनी स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, उपस्थित नागरिकांची भेट घेऊन त्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



परभणी-आज दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त तहसील कार्यालय जिंतूर येथे उत्कृष्ट बीएलओ व विविध स्पर्धा घेण्यात आलेले विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

### संविधान निर्मितीची प्रक्रिया विषयावर श्री के.बा.विद्यालयात व्याख्यान- सुरेश रणखांबे

**सेलू,/प्रतिनिधी:** येथील श्री केशवराज बाबासाहेब विद्यालयात भारतीय संविधान अमृत महोत्सव २०२४-२५ अंतर्गत ''घर घर संविधान'' या उपक्रमांतर्गत '' संविधान निर्मितीची प्रक्रिया '' या विषयावर सेवानिवृत्त उपमुख्याध्यापक सुरेश रणखांबे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमपूजनाने व्याख्यानाची सुरुवात झाली.



यावेळी व्यासपीठावर सुरेश रणखांबे,मुख्याध्यापक सिद्धार्थ एडके,मुख्याध्यापक बालासाहेब हळणे,जेष्ठ शिक्षिका अलका धर्माधिकारी आदींची उपस्थिती होती.

प्रास्ताविकात सिद्धार्थ एडके यांनी संविधानाबद्दल माहिती देत संविधान हा ग्रंथ मोलाचा असल्याचे सांगितले.

व्याख्यानात सुरेश रणखांबे म्हणाले की,ब्रिटिशांनी आपल्या भारतात त्यांनी तयार केलेले कायदे राबवले. १६ मार्च १९४६ रोजी ब्रिटिशांनी भारतीयांना जाहीर केले की आम्ही भारताला स्वातंत्र्य देणार आहोत व तुम्ही भारतीयांनी भारताचा कारभार चालवण्यासाठी संविधानाची निर्मिती करावी. संविधान निर्मिती प्रक्रिया कशी राबवली गेली याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.संविधान निर्मिती होत असताना संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील अनेक देशांच्या घटनांचा अभ्यास देखील केला.आणि संविधान निर्मितीला सुरुवात झाली. स्वातंत्र्य,समता,बंधुता आणि न्याय या मूल्यांवर संविधानाचा पूर्ण आराखडा तयार झाला आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिवसरात्र मेहनत करून देशासाठी हे संविधान तयार केले.भारतीय संविधानाचे २२ भाग आहेत. त्यात ३९५ कलमे व ८ परिशिष्ट आहेत.आणि संविधान पूर्ण झाल्यानंतर घटनेचा आराखडा मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी सुपूर्द केला.आणि हाच दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो.आणि २६ जानेवारी १९५० रोजी आपण संपूर्ण देशाने हे संविधान अंगिकारले व तेव्हापासून संविधानानुसार आपल्या देशाचा कारभार करण्यास सुरू झाला.यासोबत संविधान निर्मिती मध्ये झालेल्या अनेक प्रक्रिया सुरेश रणखांबे यांनी विद्यार्थ्यांना सांगितल्या.तसेच संविधानातील मूलभूत हक्क,कर्तव्य,सर्वांसाठी समान कायदा,मतदान अधिकार, यासोबत भारतीय संविधानातील मूलभूत तत्वे,अधिकार यासह अनेक सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली.सर्वांच्या विकासासाठी संविधान अत्यंत मोलाचे आहे व संविधानामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला आपली हक्क व कर्तव्ये जपता येतात असेही त्यांनी सांगितले.संविधानामुळे नागरिकांना मिळालेले विविध अधिकार तसेच संविधानातील विविध कलमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश मारेवाड तर आभार किशोर खारकर यांनी मानले.

# जे जाणल्यावर काही जाणण्याचे शिल्लक राहत नाही ते खरे ज्ञानचैतन्य प्रतिष्ठानच्या प्रवचनमालेत गुरुवर्य चैतन्य महाराज देगलूरकर यांचे प्रतिपादन

**परभणी,/प्रतिनिधी-** मनुष्याच्या विचारांना ज्ञान म्हणणे योग्य होणार नाही, विचारात ज्ञान नसते. विचार हासुध्दा एक प्रकारचा विकारच आहे. शुध्द ज्ञानाच्या अभिव्यक्तीची शैली म्हणजे विज्ञान तर जे जाणल्यावर आणखी काही जाणण्याचे शिल्लक राहत नाही त्यालाच श्रीमद् भगवत्गीता खरे ज्ञान म्हणते, असे प्रतिपादन गुरुवर्य चैतन्य महाराज देगलूरकर यांनी केली. शहरातील नांदखेडा रोडवरील वैष्णवी मंगल कार्यालयात रविवार २६ जानेवारी ते मंगळवार २८ जानेवारी दरम्यान चैतन्य प्रतिष्ठान परभणी आयोजित 'श्रीमद् भगवत्गीता भावदर्शन ' या प्रवचनमालेच्या पहिल्या दिवशी भगवत् गीतेच्या सातव्या अध्यायावरील प्रवचनात ते बोलत होते.

यावेळी हभप माधवबुवा आजेगांवकर, भागवताचार्य बाळु गुरु असोलेकर, माजी महापौर मीनाताई वरपुडकर, वेदमुर्ती विलासगुरु लिंबेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी आर्किटेक्ट रिया विकास मिश्रा हीचा महाकुंभ प्रयागराज येथे करण्यात आलेल्या विशेष कामासाठी महाराजांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पुढे बोलतांना देगलूरकर महाराज म्हणाले की, सहाव्या व सातव्या अध्यायाचा जन्यजनक भाव तर्कशुध्दतेने भाष्याद्वारे कळतो. गीतेच्या अभ्यासाचा सांप्रदाय इतर ब्रम्हसुत्र आदी ग्रंथांपेक्षा वेगळा आहे. त्यामुळे प्रत्येक अध्यायागणिक अर्जूनाच्या मोहात, ज्ञानात, मनोभूमिकेत टप्प्या टप्प्याने होत गेलेले बदल भगवत् गीतेच्या सुक्ष्म अभ्यासाद्वारे कळून येतात. भाष्याद्वारे जसे गीतेचे ज्ञान होते, तसे गीतेचा भाव कळण्यासाठी ज्ञानेश्वरी अंतःकरणात रुजविणे अवश्यक ठरते. गीतेमधील मानवी कल्याणाची सूत्रे ज्ञानेश्वरी विस्तारुन सांगते. अर्जून व धृतराष्ट्र दोघेही जरी मोहग्रस्त झाले




असले तरी अर्जूनाचा मोह कौरव-पांडवात ऐक्य व्हावे यासाठी तर धृतराष्ट्राचा मोह कौरव-पांडवात भेद व्हावा यासाठी आहे. त्यामुळे दोन्ही मोह ज्ञानासाठी पात्र असले तरी भेदाच्या मोहापेक्षा ऐक्याचा मोह चांगला आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, गीतेच्या अभ्यासाद्वारे मनोरंजनापेक्षा आत्मरंजन होणे हे ध्येय असले पाहिजे. चिंतन, कथन व अन्योन्य प्रबोधन यांचा मिळून अभ्यास होत असतो. समर्थदाता जसा कोणाही याचकाला नाही म्हणत नाही, तसे गीतेचा अभ्यास करणाऱ्या कोणालाही ज्ञान मिळाल्याशिवाय राहत नाही.

त्यामुळे खरे ज्ञान हे केवळ शब्दांद्वारे न होता, अर्थासह दृष्टांत व स्वानुभव यातून प्रगट होत असते. शुध्द ज्ञानाच्या अभिव्यक्तीला विज्ञान असे म्हणतात. प्रपंचातील दृष्टांताद्वारे खऱ्या ज्ञानाचे तत्व समजून सांगणे हे विज्ञानाचे काम आहे. स्वीकार्ह किंवा ताज्य भाव निर्माण करण्याचे काम वर्णनाचे आहे. अज्ञान, विज्ञान व ज्ञान हे ज्ञानाचेच प्रकार असून सविज्ञानपूर्वक दृष्टांत सांगून ज्ञानाची भूमिका प्रतिपादन करणे हे गीतेचे काम आहे, असे ते म्हणाले.

मयंक परळीकर यांनी गायलेल्या अभंगाद्वारे कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यांना कृष्णा लिंबेकर व सोहम मोहनपुरकर यांनी साथ केली. चैतन्य प्रतिष्ठानचे सदस्य स्व. प्रबोध देशपांडे व वारकरी सांप्रदायाचे अध्वर्यू किशन महाराज साखरे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. सूत्रसंचालन शंकर आजेगांवकर यांनी केले. नितीन शेवलकर यांनी गायलेल्या पसायदानाद्वारे कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी परिसरातील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती....

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# शाश्वत शेती, शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून परिवर्तन घडवूया : पालकमंत्री सावे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ जानेवारी**

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचे झेंडावंदन आज राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण,दुग्धविकास,अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पोलीस कवायत मैदान वजिराबाद नांदेड येथे झाले. यावेळी त्यांनी नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी शाश्वत शेती व शाश्वत ऊर्जेच्या सर्व प्रकल्पांना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचा संदेश यंत्रणांना दिला. आजचा प्रजासत्ताक दिन विविध विभागांचे लक्षवेधी सादरीकरण व चित्ररथांमुळे स्मरणीय ठरला.आज सकाळी ९.१५ वा. पालकमंत्री अतुल सावे यांनी ध्वजवंदन केले. त्यानंतर पोलीस वाहनातून त्यांनी संचलन करणाऱ्या पथकांचे निरीक्षण केले. आजच्या परेडचे नेतृत्व पोलीस उपअधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांनी केले.

यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद तिडके, विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,



मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, उपजिल्हाधिकारी निवासी महेश वडदकर, स्वातंत्र सैनिक, वरिष्ठ अधिकारी, वारसपत्नी आणि जेष्ठ सन्माननीय नागरिक, विविध पक्षांचे पदाधिकारी, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमामध्ये अनेक मान्यवरांना अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांच्या उपलब्धीसाठी त्यांचा सत्कारही करण्यात आला.

यावेळी पालकमंत्र्यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी केंद्र व राज्य शासनाने शेती आणि अपारंपरिक ऊर्जेच्या स्त्रोतांना शाश्वत सुत्रामध्ये बांधण्याचे धोरण अधोरेखीत केले. जिल्ह्यातील सिंचन सुविधा आणखी बळकट करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही सांगितले. यावेळी त्यांनी किवळा साठवण तलाव पिण्याच्या पाण्यासाठी उपयोगात आणल्यास सिंचन क्षमता आणखी वाढेल. यासाठी तातडीने शहराच्या पाणीपुरवठ्यामध्ये सुधारणा करण्याबाबतच्या सूचना केल्या.चित्ररथ ठरले लक्षवेधी

यावर्षी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी वेगवेगळ्या विभागांना मोठ्या प्रमाणात आपल्या उपलब्धीला चित्ररथाच्या स्वरूपात मांडण्याचे आवाहन केले होते त्याला प्रतिसाद देत अनेक विभागांनी आपले चित्ररथ तयार केले होते पालकमंत्र्यांनी या चित्ररथाचे निरीक्षण केले. महानगरपालिका, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, समाज कल्याण विभाग व क्रीडा विभागाचे चित्ररथ लक्षवेधी ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली नाथू, रविंद्र पांडागळे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त



### आश्रम शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा

**नायगांव**-तालुक्यातील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पोष्ट बेसिक ज्यू कॉलेज व माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेत ७६वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. तालुक्यातील मरवाळी तांडा येथील ग्रामपंचायती सह माध्यमिक ,उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील प्राचार्य विजयकुमार देशमुख, नामदेव राठोड, कुसुम राठोड, ग्रामविकास अधिकारी नामदेव माने सरपंच डॉ. मधुकर राठोड ,पो.पा.दशरथ राठोड , सेवानिवृत्त माजी प्राचार्य किशनराव राठोड भारत बेटकर,श्रीराम राठोड,शेषेराव बोईवार,सेवानिवृत्त शिक्षक सिताराम जाधव,पवळे, परसराम राठोड, संभाजी पवार, प्रकाश चव्हाण, श्रीनिवास जाधव, अनिल जाधव, अजय राठोड, विजय आडे, पांडुरंग जाकोरे,यांच्या उप स्थितीमध्ये शाळेच्या भव्य पटांगणात सर्व प्रथम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रतन राठोड यांच्या हस्ते महात्मा गांधी व महामानव डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करून.ध्वजावंदन करण्यात आले. तद्नंतर पोष्ट बेसिक ज्यू. कॉ. मधील प्राध्यापक माधव वाघमारे यांच्या संचाने देशभक्तीपर गीत गायीले व त्यानंतर कॉलेज मधील पुजा लोहबंदे विद्यार्थ्यीनी ने एके काळी समाजातील स्त्रीला ही चूल आणि मूल एवढ्याच चौकडीत राहुन. जिवनाचा चारितार्थ भागवावा लागायचा तीच आजची महिला भारतीय संविधानामुळेच प्रतिभा ताई पाटील यांच्या रुपाने आज देशातील सर्वोच्च पदा वर विराजमान होण्याचा बहुमान मिळविला आहे. अशी भावना या वेळी आपल्या मनोगतातून व्यक्त केली आहे.या नंतर संस्थेच्या वतीने ७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने मरवाळी तांड्या सह यापंचक्रोशीतून आलेल्या पाहुणे मंडळी सर्व विद्यार्थ्यांसाठी गोड सुरुची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक ज्यू कॉ.पोष्ट बेसिक ज्यू.कॉ.चे सुर्यकांत जाधव, आनंदराव सुर्यवंशी, नागनाथ येल्लूरे, व्यंकट रेकुळवाड, पांडुरंग जाधव,नागोराव चव्हाण, एकनाथ मुनगीलवार, साहेबराव येवरे, सतिश हाणमंते, फेरोज शेख, काशीनाथ बन, सुभाष राठोड, आकाश सुर्यवंशी, पांडुरंग येवले, विश्वनाथ स्वामी, गणेश मारताळेकर, दिलीप माने, दिलीप गोरे शिवशंकर कोरे, प्रदिप लाभशेटवार, वस्तीगृह अधिक्षक राजू मरवाळीकर सह अन्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंच लन प्राध्यापक हेमंत बावणे यांनी केले तर आभार प्रदर्शन कवी शंकर राठोड यांनी केले आहे. तालुक्यातील मरवाळी तांडा येथील आश्रम शाळेत ७६वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

### मलकागुडा येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त शालेय साहित्याचे वाटप



**माहूर-** तालुक्यातील मलकागुडा येथे भारतीय प्रजासत्ताक दिना-निमित्य जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मलकागुडा व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सिडामखेड या दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दि.२६ जानेवारी रोजी तालुक्यातील मलकागुडा ग्रामपंचायत येथे भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.मलकागुडा गट ग्रामपंचायतच्यावतीने मलकागुडा व सिडामखेड येथील जि.प.प्रा. शाळेचे विद्यार्थीना निमंत्रित करण्यात आले होते. दोन्ही शाळेतील विध्यार्थ्यांच्या वतीने गायन, इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेतून भाषण, चावडीवाचन, नाटक,गृहपाठ, इंग्रजी पाढे या शालेय अभ्यासक्रम, वक्तृत्व,अभिनय या विविध कलेचे प्रदर्शन इय्यता पहिली ते चौथीच्या चिमुकल्या विध्यार्थ्यानी याप्रसंगी उत्कृष्टपणे सादर केले. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करताना गावातील उच्चशिक्षित तरुण मृत्युंजय पडलवार यांनी दोन्ही शाळेच्या उपस्थित सर्व विध्यार्थ्यांना प्रजासत्ताकदिनाचे महत्व सांगत शालेय अभ्यासाबद्दल मार्गदर्शन केले.

# ग्रामपंचायत लिपिक पदाचा निकाल जाहीर करण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. २७ जानेवारी**



ईस्लापूर येथील ग्रामपंचायत कार्यालय येथील लिपिक पदाची जागा रिक्त असल्या कारणाने येथील ग्रामपंचायत कार्यालयाने दि. १३ जुलै२०२४ रोजीच्या दैनिक प्रजावानी या वृत्तपत्रात जाहीर प्रगट दिले.

त्याचप्रमाणे दिनांक २० जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत या परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्याची वेळ देण्यात आली होती नंतर सर्वांचे अर्ज तपासणी झाली व परीक्षेसाठी एकूण ४४ उमेदवार पात्र ठरले होते व सर्वांना हॉल तिकीट देण्यात आले व दिनांक ०८ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ०१ ते २ यावेळेत इस्लापूर ग्रामपंचायत कार्यालय येथे पेपर देण्या करिता एकूण ४१ परीक्षा आर्थी उपस्थित होते व पेपर प्रक्रिया पूर्ण झाली व दि.१४ ऑगस्ट २०२४ रोजी उत्तर तालीका सुचना फलकावर जाहीर करण्यात आली नंतर दि.१५ ऑगस्ट २०२४ रोजी इस्लापूर ग्रामपंचायत कार्यालय येथे सर्व परीक्षा आर्थी समोर पेपर तपासणी व निकाल प्रक्रिया पूर्ण झाली यावेळी सत्येश्वर पेशवे या विद्यार्थ्यांना ९०+२ एकुण ९२ गुण मिळाले समजले तेव्हा गोंधळ झाला असे शुल्लक कारण दाखवून परीक्षेचा निकाल ताटकळत ठेवला.

व नंतर सत्येश्वर पेशवे यांनी ग्रामपंचायत कार्यालय यांना वारंवार निकाल जाहीर करण्याकरिता पत्रव्यवहार केला या कार्यालयाकडून कुठलाही प्रतिसाद न मिळाल्याने सत्येश्वर पेशवे यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे पत्रव्यवहार करूनही त्यांना कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही म्हणून आज इस्लापूर येथील ग्रामपंचायत कार्यालया समोर आमरण उपोषणाला बसून लिपिक पदाचा निकाल देईपर्यंत उपोषण मागे घेणार नाही अशी माहिती उपोषण कर्त्यांनी दिली.

# स्व: पत्रकार गंगाधर सवई यांना आदराजंली

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २७ जानेवारी**

उमरी तालुक्यातील जेष्ट पुरोगामी फुले शाहू आंबेडकर चळवळीचे नेते तथा जेष्ट पत्रकार स्वः गंगाधर मानिकराव सवई यांना उमरी पत्रकार संघाकडून दि . २५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजत शोकसभा घेवून विन्रम अभिवादन पर आदराजंली वाहण्यात आली आहे .



स्व गंगाधरराव सवई गेली ४० वर्ष आंबेडकर चळवळ तालुक्यात जिवंत ठेवली आहे अन्याय अत्याचार विरोद्धात संघर्ष करणारा हा योद्धा होता त्यांनी सामाजिक चळवळी सह इतर अठरा पगड समाजातील न्याय देण्याचे काम केले त्यांनी आंबेडकर चळवळ चालविताना स्वयम बरबाद झाले पण समाजासाठी मानुसकीचा ठेवा ठेवून गेले आहेत आज त्यांचे मुले त्रिरत्न सवई हा उदोगात तर दुसरा मुलगा ड .भिमराव सवई हा कायदयात तर तिसरा मुलगा प्रा . सुदिप हा शैक्षणीक क्षेत्रात माहेर आहेत अशा तिमुर्ती संपती कमावली आहे.

त्यांच्या या कार्यास आदराजंली म्हणून कार्यक्रमाचे नियोजन नगरसेवक तथा माजी बांधकाम सभापती ईश्वर आण्णा सवई , माजी उपनगराध्यक्ष अनिल सोनकांबळे , डि जी तुपसाखरे , सामाजीक विद्वते सुरेश हानमंते , यांनी केले आहे . या कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ट पत्रकार पी जी गिलचे होते तर त्यांना आदरांजली वाहण्यासाठी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध प्रबोधनकार लॉडबुद्धा गायक भिमशाहिर बाबुराव गाढेकर पिंपळढवकर यांचा संच आपल्या गायणातून विनम्र श्रद्धांजली अर्पण केली आहे .

यावेळी माजी प्राचार्य ए एस जाधव सर , माजी नगरसेवक सुरेश सवई ,नगरपरिषद वरिष्ट कर्मचारी गणेश मदणे ,नगरसेवक प्र. सोनू वाघमारे , भिमशाहीर पत्रकार भिमराव वाघमारे , माजी नगरसेवक राजेश सवई, खा. पि.ए. दासा शिंदे, माहिती तालुकाध्यक्ष संदिप गोवंदे, जमादार श्रीराम सवई, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अरुण भद्रे, समाजभूषण किशनदादा कुदळेकर, बालाजी देवके, खंडेलोटे, पवार, वाघमारे कार्लेकर, मारोती वाघमारे , यासह पत्रकार बापूराव रिठ्ठेकर, प्रशांत जोधंळे ' कैलास सोनकोबळे , पांडूरंग सोनकांबळे, किशोर कवडीकर, प्रा. वंसत सवई, संपादक उध्दव मामडे, संपादक फराद बेग, प्रकाश कार्लेकर , आनंदा राठोड , बालाजी बंगारीकर , पत्रकार जाधव , साहेबराव तुरेराव आदी पत्रकार बांधवासह सामाजिक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# राजेश्वर कांबळे जनहित दर्पण पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. २७ जानेवारी**

पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कंधारचे प्रख्यात पत्रकार राजेश्वर कांबळे यांना राज्यस्तरीय जनहित दर्पण पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नांदेड जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रविण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते राजेश्वर कांबळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान, जवळा (दे) ता.लोहा जि.नांदेड यांचा राज्यस्तरीय जनहित पुरस्कार वितरण सोहळा सोमवारी, २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बाजार मैदान, सोनखेड ता.लोहा येथे तिसऱ्या राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलनात पार पडला.



यावेळी संमेलनाध्यक्ष तथा ग्रामीण कथाकार राजेंद्र गहाळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे सदस्य श्रीधर नांदेडकर, माजी जि.प.सदस्य कालिदास मोरे, राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष भैय्यासाहेब गोडबोले, सोनखेडचे सरपंच प्रतिनिधी रामदास इंगळे, सोनखेडचे उपसरपंच सुनील मोरे, जेष्ठ साहित्यिक देविदास फुलारी, पूर्व संमेलन अध्यक्ष प्रा.महेश मोरे, सेवानिवृत्त कॅप्टन संजय कदम, सेवानिवृत्त शिक्षक उत्तमराव मोरे, ग्रामपंचायत सदस्य सोपानराव मोरे, रामकिशन वड, माणिकराव मोरे, माऊली मोरे, दत्तात्रय फाजगे, आनंद गोडबोले आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यात कंधारचे प्रख्यात पत्रकार राजेश्वर कांबळे यांना राज्यस्तरीय जनहित दर्पण पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नांदेड जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रविण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते राजेश्वर कांबळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल आणि पुष्पहार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# किनवट माहूर रिक्त पोलीस ठाण्यातील अनुशेष तातडीने भरा; मुख्यमंत्र्यांना आ. केराम यांचे पत्र

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २७ जानेवारी**

किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यात कार्यरत असलेल्या दुर्गम, डोगंराळ भागातील पाच पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचाऱ्यांची जवळपास तीस ते चाळीस टक्के पदे ही रिक्त आहेत.अपुऱ्या संख्याबळामुळे कायदा व सुव्यव्यवस्था टिकऊन ठेवण्यासाठी कसरत होत असुन ही बाब लक्षात घेऊन आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देऊन पोलीस कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा अनुशेष भरून काढण्याची मागणी केली आहे.



लोकसंख्या व भौगोलिक दृष्टीने नांदेड जिल्ह्यातील सर्वात मोठे तालुके म्हणून किनवट माहूरची नोंद आहे. हा भाग आदिवासी डोंगराळ व मागास असल्यामुळे दोन्ही तालुक्यात ५ पोलीस ठाणे कार्यान्वित असून प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत ५० ते ६० गावांचा समावेश आहे.

परंतु गेल्या कित्येक दिवसापासून या पाचही पोलीस स्टेशनअंतर्गत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अनेक पदे रिक्त आहेत. किनवट पोलीस ठाण्यात ९५ पदे मंजूर आहेत त्यापैकी केवळ ४९ पोलीस कार्यरत आहेत.इस्लापूर ठाण्यात ५९ मंजूर पदापैकी केवळ २६ कर्मचारी आहेत.मांडवी ठाण्यात ७० पदे मंजूर असताना प्रत्यक्षात २२ कर्मचारी आहेत. माहूर पोलीस ठाणेअंतर्गत ७० पदे मंजूर आहेत परंतु तेथे केवळ ३६ पोलीस कर्मचारी आहेत.सिंदखेड ठाण्यात ४५ पदाची मंजुरी असताना केवळ २३ कर्मचाऱ्यावर संपूर्ण भार आहे.या व्यतिरिक्त उ-४७ रायफलधारी ४५ पदे मंजूर आहेत परंतु १२ हजर आहेत. किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यातील बहुतांश लोकसंख्या जंगलव्यापी दऱ्याखोऱ्यात, वाडी तांड्यात वास्तव्य करून आहे. अशा भागातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने व जनतेच्या रक्षणासाठी अपुऱ्या कर्मचाऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे.गुन्हेगारी,अवैध धंद्यावर अंकुश ठेवताना तसेच सण उत्सव काळात पोलिसावर बंदोबस्तचा प्रचंड ताण पडतो. रिक्त पदासंदर्भात जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांना अनेकदा तोंडी कळविले परंतु प्रतिसाद मिळाला नसल्याची बाब आ. भीमराव केराम यांनी पत्रात नमूद केली असून पाचही पोलीस ठाण्याअंतर्गत रिक्त पदांचा अनुशेष भरून काढण्यासाठी संबंधिताना तातडीचे आदेश द्यावेत अशी मागणी त्यांनी केली आहे.

# प्रजासत्ताक दिना निमित्त विद्यार्थ्यांना फळे व शैक्षणिक साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २७ जानेवारी**

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष, माजी मंत्री मा.बबनराव घोलप, विदर्भ अध्यक्ष संबा वाघमारे, प्रदेश अध्यक्ष माधवराव गायकवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेड युवा तालुकाध्यक्ष सुभाष दुधंबे, सामाजिक कार्यकर्ते वैभव हाटकर, विकास उन्हाळे, चंद्रकांत वाघमारे, वरद हाटकर, आदि प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते यांनी राजर्षी शाहु प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व तसेच अंकुर शिक्षण संस्था संचलित निवासी मुकबधिर विद्यालय वसतिगृह, जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा मुदखेड येथे विद्यार्थ्यांना फळे, व शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी वरद हाटकर, बालाजी राठोड, विकी दुधंबे, उद्धव राठोड, बादल राठोड, हरिश कांबळे, आर्दीची उपस्थिती होती.

# मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेतील सर्व कार्यालयात स्वच्छता मोहिम

**अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ जानेवारी**

२५- राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत स्वच्छता हा महत्त्वाचा विषय असून शुक्रवार दिनांक २४ जानेवारी रोजी जिल्हा परिषदेच्या अंतर्गत सर्व कार्यालयांमध्ये व्यापक स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या हस्ते या मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावर यांची उपस्थिती होती.




या स्वच्छता मोहिमेच्या माध्यमातून जिल्हा परिषदेतील सर्व विभागातील खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालये व परिसराची स्वच्छता केली. या मोहिमेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक संदेश गेला असून, स्वच्छता ही केवळ कर्मचाऱ्यांची नव्हे, तर सर्वांची जबाबदारी असल्याचा संदेश दिला गेला आहे.

सर्व कार्यालयात स्वच्छतेचा उपक्रम सातत्याने राबविणे ही आपली जबाबदारी आहे. अधिकारी व कर्मचारी यामध्ये सक्रिय सहभाग घेतल्यास हा उपक्रम यशस्वी होईल, असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी व्यक्त केले.

तालुका स्तरावरील सहभाग

राज्याचे मुख्यमंत्री महोदय यांच्या सात कलमी कार्यक्रमातील स्वच्छता उपक्रमाला जिल्ह्यातील तालुका स्तरावरही मोठा प्रतिसाद मिळाला. पंचायत समिती, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामपंचायत आदींमध्ये ही मोहिम राबवण्यात आली. गट विकास अधिकारी, आरोग्य अधिकारी, शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि अन्य कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या मोहिमेदरम्यान कार्यालयांमधील टेबल-खुर्च्यांची सफाई, कपाटांतील फाईल्सचे वर्गीकरण, तसेच परिसराची स्वच्छता करण्यात आली.

**तहसिलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी**
**उमरी यांचे न्यायालयात**
**इ.कि.फौ. अर्ज.क. १८१/२०२४**
**पिराजी शंकर शिंदे**
**विरुध्द**
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बोरजुनी ता.उमरी**

**प्रकरण : मृत्यू नोंद घेणे बाबत.**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे पिराजी शंकर शिंदे रा. बोरजुनी ता.उमरी जि.नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म/मृत्यू नोंदणी कायदा २०२३ अन्वये दि. १६/१२/२०२४ रोजी नोंद घेण्यासाठी इ.कि.फौ अर्ज १८१/२०२४ दाखल केला आहे.

अर्जदार यांचे वडील नामे शंकर नागोबा शिंदे यांचा मृत्यु दिनांक २९/०९/२००२ रोजी झाल्याची नोंद मौ. बोरजुनी ता. उमरी जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसांच्या आत सदर करावा, नंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. १५ दिवसात आत आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

**दिनांक-२४/१२/२०२४** **आदेशावरून तहसिलदार**
**स्थळ- उमरी** **उमरी**